# Shiv Shrimant Kokate
# Shivaji Rajanche Khare Shatru Kon?

## प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराज हे जागतिक कीर्तीचे, आणि कर्तुत्वाचे राजे आहेत. भूमिपुत्रांच्या सहकार्याने राजांनी स्वराज्य निर्माण केले. पण राजांचे निर्विवाद चरित्र उपलब्ध नाही हे कटूसत्य आहे. कल्पितकथा, रंजकता हे शिवचरित्रातील अडथळे आहेत. शिवचरित्र हे पुस्तकात न मावणारे जीवनकार्य आहे. शिवचरित्रावर अनेक अंगानी लिहिणे गरजेचे आहे. **शिवचरित्र हे केवळ डोक्यावर घेऊन मिरवण्याचा विषय नाही, तर डोक्यात घालण्याचा विषय आहे.** शिवचरित्रावर मालिका, नाटके, चित्रपट, महानाट्य निर्माण करणे आणि व्याख्याने देणे हा अनेकांनी धंदा केला आहे. अशा काळात कटुतेचा विचार न करता श्रीमंत कोकाटे यांनी अत्यंत संशोधनपूर्ण असे ''शिवाजीराजांचे खरे शत्रू कोण?'' हे राजांच्या जीवनातील अपरिचित बाबींवर प्रकाश टाकणारे पुस्तक लिहिले आहे. राजांना जातीय-धार्मिक चौकटीत अडकवणे, रायरेश्वराच्या मंदिरात शपथ घेतली की नाही, महाराणी पुतळाबाईचे सती जाणे, भवानी तलवार, बहुजनप्रतिपालक म्हणण्याऐवजी गा ब्राह्मणप्रतिपालक म्हणणे यापाठीमागचे षडयंत्र, जिजाऊमॉसाहेबांचे निधन कसे झाले? राजांचा खून कशा प्रकारे करण्यात आला? मनुवादी शिवजयंतीच्या तारखेला विरोध का करतात? याबाबत श्रीमंतचे संशोधन नाविन्यपुर्ण आहे. यासाठी श्रीमंत कोकाटे यांनी बरेच श्रम घेतले आहेत.

राजांनी सर्व जातीधर्माच्या भूमिपुत्रांना सोबत घेऊन स्वराज्य निर्मिती केली. त्यामध्ये बाजी पासलकर, कान्होजी जेधे, शिवाजी काशिद, जिवा महाला, बहिर्जी नाईक, हिरोजी फर्जंद, नुरखाण बेग, काझी हैदर, लाय पाटील, येसाजी कंक, फिरंगोजी, प्रतापराव, कोंडाजी फर्जंद, सुर्यराव काकडे, नेताजी पालकर, सिद्धि हिलाल, सिद्धि इब्राहिम, फकिराचा खापर पणजोबा, मुरारजी व बाजीप्रभू, हे प्रभू इ. सर्व जाती धर्माचे सहकारी राजांसाठी प्राणपणाने लढले.

या प्रसंगी दादोजी कोंडदेव, कृष्णाजी कुलकर्णी, रामदास, मोरोपंत इ. अनेक भटजी आडवे आले. आडवे आलेल्यांना राजांनी पराभूत केले. अफजलखान भेटीच्या प्रसंगी राजांवर वार करणाऱ्या कृष्णाजी भास्कर कुलकर्णीला राजांनठ ठार मारले. राजांना आजन्म त्रास देणाऱ्या शत्रूची माहिती तर श्रीमंतने प्रस्तुत पुस्तकात दिलीच, पण आजच्या तारखेपर्यंत शिवचरित्र, शिवसूत्र आणि शिवनीतीला

जाणीवपूर्वक बदनाम करणाऱ्या टिळक, सावरकर, पुरंदरे, बेडेकर आणि य.दि. फडकेंचा देखील पर्दाफाश केला आहे.

महाराजांना जिवंतपणी त्रास देणारे जसे शत्रू आहेत, तसेच त्यांचा बदनामीकारक इतिहास लिहिणारे फडके, माटे, कंटक देखील शत्रू आहेत. त्यांनी राजांचा व मराठा स्त्रियांचा बदनामीकारक इतिहास पहिल्या खंडात लिहिला. श्रीमंतने या बाबतीत लिहिले आहे. पण प्रतिक्रिया देण्यात शक्ती खर्च करण्योक्षा नवनिर्मितीची गरज आहे. भावनिक पातळीवर लेखन कालबाह्य ठरते. यासाठी शत्रूंचा उल्लेख करुन त्यांना मोठे करण्यापेक्षा शिवाजीराजांच्या मित्रांवर देखील लिहावे. शिवचरित्रातील अनेक बाबी अनभिज्ञच आहेत. त्यांचा शोध घ्यावा.

श्रीमंत हा सृजनशिल अभ्यासू आणि परखड विचारांचा प्रभावी वक्ता आहे. त्यामुळे विनंतीवजा सूचना आहे की, संभाजीराजांवर देखील लिहावे.

पुरुषोत्तम खेडेकर

(राष्ट्रीय अध्यक्ष, मराठा सेवा संघ)

## लेखकाचे मनोगत...

शिवाजीराजे हे विश्ववंद्य राजे आहेत. राजांचे कर्तृत्व हे सुवर्णाक्षरांनी घराघरात कोरुन ठेवावे असे आहे. राजांनी फक्त ५० वर्षाच्या आयुष्यात अशक्य कार्य शक्य करून दाखविले. समाजव्यवस्थेत आमुलाग्र परिवर्तन करण्यासाठी राजांनी निर्भिडपणे झुंज दिली. यासाठी राजांना हातात शस्त्र धरावे लागले. पण राजांनी शस्त्राचे युद्ध कमीतकमी केले. चातुर्याचा वापर करून राजांनी परचक्र निर्दाळले. याप्रसंगी त्यांना खुप विरोध झाला. ज्यांना विरोध होत नाही ते परिवर्तन करु शकत नसतात. प्रसंगी राजांवर प्राणघातक हल्ले झाले, नाउमेद करण्याचा प्रयत्न झाला. पण राजांनी या सर्व संकटावर मात केली. अफजलखान, शाहिस्तेखान, सिद्धीजौहर, दिलेरखान, औरंगजेब या शत्रूंना शिवरायांनी पराभूत केले. कारण ते उघड शत्रू होते, उघड शत्रूविरुद्ध लढणे फार सोपे असते. त्यांच्याविरुद्ध डावपेच आखता येतात. पण गुप्तशत्रूविरुद्ध डावपेच आखता येत नाहीत. त्यामुळे उघड शत्रूपेक्षा गुप्त शत्रू फार खतरनाक असतो. औरंगजेब ते अफजलखान हे राजांचे उघड शत्रू होते. ते राजांचे कट्टर विरोधक होते. याबाबत दुमत नाही. पण राजांच्या आश्रयाला राहणारे मित्रत्वाचे सोंग करणारे आणि संकटसमयी शिवरायांना ठार मारण्यासाठी उघड शत्रुंच्या कळपात सहभागी होणारे राजांचे खरे शत्रू आहेत. पण पक्षपाती इतिहास लेखनाकांनी या शत्रूचा जाणीवपूर्वक उल्लेख टाळलेला आहे. समकालीन कागदपत्र, वस्तुनिष्ठ पुरावे असतानादेखील राजांच्या शत्रूंचे उदात्तीकरण करण्याचे पातक काही शिवशाहिरांनी आणि कादंबरीकारांनी केलेली आहे. परंतू इतिहासात कविकल्पना, रंजकता, व्यक्तिगतमत, लालित्य, व्देष, पुर्वग्रहदूषितवृत्ती या बाबींना अजिबात स्थान नसते.

शिवाजी राजांच्या इतिहासाचे तटस्थपणे आणि पारदर्शक वृत्तीने लेखन केले तर शिवाजी राजांचे खरे शत्रू दादोजी कोंडदेव, कृष्णाजी कुलकर्णी, रायबाघीण देशमुख, मुरगुडनांदगांव येथील जोशी, मोरोपंत पिंगळे, आण्णाजी दत्ते, उमाजी पंडित, राहुजी सोमनाथ, गागाभट्ट, हणूमंते, रामदास इ. आहेत. वरील सर्वांनी राजांना कसा व किती त्रास दिला. स्वराज्यनिर्मितीच्या कामात कसे अडथळे आणले. प्रसंगी राजांच्या अंगावर वार केले. अखेर शिवरायांचा खून देखील राहुजी सोमनाथाने कसा केला. हे आपणाला प्रस्तुत पुस्तकात वाचण्यास मिळेलच परंतु आपणाला काही बाबी अप्रिय वाटतील आणि खटकतीलसुद्धा. पण मित्रहो **एक खोटं हजारो वेळा सांगितलं की खरे वाटत असते, आणि एक खरे सुरुवातीला सांगितले की खटकत असते.** पण हे खरे सांगण्याचे धाडस आणि आणि ऐकून, वाचून, समजून घेण्याचे धाडस आत्ता आपण करावे. ही नम्र विनंती करतो. काही बाबी खटकल्या तर विचार नावाची खूप मोठी शक्ती आपल्या पाठीशी आहे. किमान आपण विचार तरी करावा. प्रस्तुत पुस्तकातील एकही शब्द निराधार लिहिलेला नाही, प्रत्येक ठिकाणी संदर्भ दिलेला आहेच. तसेच पाठीमागे संदर्भ सूची देखील दिलेली आहे. घडलेल्या घटनेमागे तार्किक, मानसशास्त्रीय, तात्विक आधार आहे.

राजांचे शत्रू त्यांच्या खुनाबरोबर संपले नाहीत, त्यांची संख्या पुढे झपाट्याने वाढली. भुमिपूत्रांचे स्वराज्य गिळंकृत करणाऱ्या पेशव्यांनी राजांनी स्वकर्तृत्वावर सुरु केलेला शिवशक बंद केला. टिळकांनी शिवजयंती बंद पाडण्यासाठी गणेशोत्सव सुरु केला. अत्रे, सावरकर, पुरंदरे, बेडेकर, फडके यांनी शिवरायांना बदनाम केले. तर विश्वभुषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिवाजीराजांचे चिकित्सक लेखन केले. राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांनी शिवजयंती सुरु केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आजन्म महाराजांचा जयजयकार करत भूमिपुत्रांना शिक्षण दिले. साहित्यरत्न थोर समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांच्यामुळेच शिवाजीमहाराज रशियाला समजले. डॉ.पंजाबराव देशमुख, प्रबोधनकार केशव ठाकरे, कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग हे शिवाजी राजांचे निस्सीम भक्त होते यासाठी अनेक वस्तुनिष्ठ संदर्भ प्रस्तुत पुस्तकात आहेत. या लेखनामागे जातीयव्देष किंवा व्यक्तीदोष नसून फक्त सत्यसंशोधन आहे**. सत्यलेखन, सत्यभाषा म्हणजे शिव्या नव्हेत.** भारतीय समाजावर हजारो वर्षापासून कथा, कादंबरी, चित्रपटांचा प्रभाव असल्यामुळे खऱ्या इतिहासापासून समाज वंचित राहिला.

वास्तव इतिहास संशोधनास व लेखनात आलिकडे महाराष्ट्रात मोठी क्रांती झालेली आहे. इतिहासाचार्य प्रा. मा. म. देशमुख हे खऱ्या इतिहासाचे जनक आहेत. गतवर्षी **विश्ववंद्य राजा शिवाजी** या माझ्या पुस्तक प्रकाशनाने मला अधिक लेखनासाठी महाराष्ट्रातील वाचकांनी प्रेरित केले. महाराष्ट्रातून प्रतिक्रियात्मक हजारो पत्रे मला मिळाली. त्या पुस्तकानंतर शिवाजीराजांचे खरे शत्रू कोण? हे पुस्तक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. माझे मित्र प्रवीण गायकवाड व शांताराम कुंजीर यांच्यामुळे हे पुस्तक वाचकांच्या हाती देता आले. **प्रस्तुत पुस्तक हे अभिरुचिपेक्षा देशाच्या आवश्यकतेसाठी आहे. कारण खरा इतिहास समजल्याशिवाय खरा इतिहास घडत नसतो.** देशातील दंगली, जातीयता, अंधश्रद्धा संपावी यासाठीच हे पुस्तक आपल्या हाती देत आहे. या पुस्तकाचे आपण एकाग्रतेने वाचन करावे व इतरांना वाचण्यास प्रवृत्त करावे ही विनंती. आपल्या अभिप्रायाची प्रतिक्षा!

**श्रीमंत कोकाट**

## शिवजयंतीच्या तारीख-तिथीचा वाद कोणी निर्माण केला

१८६९साली राष्ट्रपिता जोतीराव फुले यांनी रायगडावरील शिवरायांची समाधी शोधून काढली व शिवरायांच्या जीवनावर जगातील पहिला आणि प्रदिर्घ असा खरा पोवाडा लिहिला. शिवरायांचे जगविख्यात कार्य घराघरात पोहचावे यासाठी जोतीराव फुले यांनी १८७० साली शिवजयंती सुरु केली. शिवजयंतीचा पहिला कार्यक्रम पुणे येथे पार पडला. तेंव्हा पासून शिवजयंती मोठ्या धुमधडाक्यात सुरु झाली. याप्रसंगी टिळक १२-१३ वर्षाचे ‘बाळ’ होते. शिवजयंतीचा वाढता लोकोत्सव पेशवाईच्या समर्थकांना खुपत होता. कारण पेशव्यांनी शिवशक बंद करून मुस्लिमांचा फसली शक सुरु केला होता. शिवरायांचा रायगड उध्वस्त करून दप्तरखाना जाळला होता. त्या पेशवाईचे समर्थन व ब्राह्मणांचे जेष्ठ पुढारी बाळ गंगाधर टिळक यांनी शिवजयंती बंद पाडण्यासाठी गणेशोत्सव सुरु करून शिवभक्तात शिवजयंतीबाबद संभ्रम निर्माण करणारे टिळक हे आद्य ब्राह्मण आहेत. पुढे ब्राह्मणांनी शिवजयंती निश्‍चित होऊ नये यासाठी ‘वाद’ कायम ठेवला. कारण शिवजयंतीच्या निमित्ताने प्रजा एकत्र येईल. खऱ्या शिवचरीत्रातून हक्क-अधिकाराची मागणी करणारे शिवभक्त निर्माण होतील, हे रोखण्यासाठी ब्राह्मणांनी शिवजयंतीचा वाद चालू ठेवला.

हा वाद संपावा यासाठी महाराष्ट्र शासनाने १९६६-६७ साली वा.सी.बेंद्रे, न.र.फाटक, ग.ह.खरे, द.वा. पोतदार, डॉ.आप्पासाो. पवार, ब.म.पुरंदरे यांची एक समिती स्थापन केली. वादग्रस्त बाबींसाठी शासन समिती स्थापन करते, उदा.श्रीकृष्ण आयोग, न्या.सावंत आयोग इ.त्याप्रमाणे शिवजयंतीची तारीख निश्‍चित करण्यासाठी शासनाने शिवचरित्र संशोधकांची समिती स्थापन केली. ज्या कामाला २ वर्ष लागतात तेथे त्यांना ३० ते ३३ वर्षे लागले, म्हणजेच हा वेळकाढूपणा होता. या समितीने १९ फेब्रुवारी १६३० ही जन्मतारीख शासनाला सादर केली.

१९फेब्रुवारी ही शिवजयंतीची तारीख जाहीर झाल्याबरोबर कालनिर्णय कॅलेंडरवाले जयंत साळगांवकर यांनी तिथिप्रमाणे शिवजयंती साजरे करावी असे आव्हान केले. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहीराती दिल्या. या पाठीमागे साळगांवकरांचे शिवरायांबाबत प्रेम नसून वाद निर्माण करणे ही भूमिका होती. साळगांवकरांनी तिथीचा आग्रह धरताच त्यासाठी पुरंदरे, बेडेकर, मेहंदळे यांनी तिथी समर्थनार्थ साळगांवकरांना पत्र दिली. शासनाच्या समितीत असणारे पुरंदरे तिथीच्या म्हणजेच ब्राह्मणांच्या कळपात घुसले. म्हणजे पुरंदरे हे शिवाजी प्रेमी नसून टिळक, साळगांवकर इ.ब्राह्मणप्रेमी व विघ्नसंतोषी आहेत हे सिद्ध होते. साळगांवकर, पुरंदरे, बेडेकर आदि ब्राह्मणांनी शिवजयंती तिथीप्रमाणे व्हावी हा आग्रह धरला. **शिवजयंतीच्या तारीख-तिथीचा वाद कोणत्याही राजकीय पक्षाने निर्माण केलेला नसून पुरंदरे, बेडेकर आणि साळगांवकर यांनी निर्माण केला.** पण हा वाद सर्वत्र व्हावा यासाठी ब्राह्मणांनी याला

राजकीय स्वरुप दिले. अनेक राज्यकर्त्यांना माहित नाही की हा वाद ब्राह्मणांनी निर्माण केलेला आहे. यासाठी ब्राह्मणांनी नेहमीप्रमाणे धर्म-संस्कृतीचे हत्यार पुढे केले. ब्राह्मणांनी शिवजयंतीच्या तारखेला विरोध तर तिथीचा आग्रह धरला. या मागील षड्यंत्र काय?

तारखेप्रमाणे शिवजयंती साजरी झाली तर वाद संपून देशात व जगात शिवजयंती होईल, कारण देशातील ग्रामपंचायत, शाळा, कॉलेजेस् पासून न्यायालय, संसद इ.सर्व कारभार तारखेप्रमाणे चालतात. तारीख वर्षातून एकदाच आणि एकाच महिन्यात येते. त्यामुळे वाद संपतो. सरकारी बँका, कार्यालये, शाळा, महाविद्यालयात शिवचरित्रावर भाषणे होतात. त्यामुळे शिवरायांचे खरे शिवचरित्र जनतेला समजते. खरे शिवचरित्र समजले तर बहुजनसमाज ब्राह्मणाला माफ करणार नाही, ही भीती ब्राह्मणांना आहे. म्हणून ब्राह्मण शिवचरित्रात, जयंतीत वाद निर्माण करतात. म्हणजे प्रतिक्रिया देण्यातच बहुजन समाजाची शक्ती खर्च व्हावी हा ब्राह्मणांचा डाव आहे. इंग्रजी कॅलेंडर म्हणून तारखेला विरोध करणारे ब्राह्मण मात्र स्वत: इंग्रजी शिकतात. इंग्रजी संगणक, मोबाईल वापरतात. जयंत साळगांवकर कॅलेंडर जानेवारी ऐवजी चैत्र महिन्यात का बाजारात आणीत नाहीत? कॅलेंडर मध्ये तारखेचे आकडे मोठे व तिथीचे लहान का टाकतात? ब्राह्मणांना आज इंग्रजी आणि पूर्वी इंग्रजांशिवाय करमत नव्हते ते आज शिवजयंतीच्या तारखेला विरोध करतात.

ब्राह्मण शिवजयंतीसाठी तिथीचा आग्रह का धरतात? तिथीप्रमाणे देशातील कोणताही कारभार चालत नाही. आपले गांव, शाळा, देश तिथीप्रमाणे नाही तर तारखेप्रमाणे चालतो. तिथी प्रमाणे वाद कायम राहतो. कारण तिथी कधी मार्चमध्ये तर कधी एप्रिल-मे मध्ये येते. तिथीप्रमाणे ग्रामपंचायत किंवा प्राथमिक शाळा देखील चालत नाही. शिवाजीराजे तर विश्ववंद्य असे युगपुरुष आहेत. तिथीत अडकविण्याइतके राजे लहान नाहीत. शिवरायांना लहानपण देऊन राजे कायम वादात रहावेत यासाठी साळगांवकरांनी तारीख-तिथीचा वाद निर्माण केला. तिथी आली की पंचांग आले, पंचांग आले की भटजी आला. भटजीची रोजगार हमी चालावी आणि वादातच शिवराय व शिवभक्त संपावेत यासाठी भटजी तिथीचा आग्रह धरतात.

तारीख तिथीचा वाद लावून ब्राह्मणांनी शिवभक्तात दोन गट पाडले तारखेचे आणि तिथीचे शिवभक्त असा संघर्ष ब्राह्मणांनी निर्माण केला. शिवरायांची दोन वेळा जयंती करुन ब्राह्मणांनी एक महान राजाची टिंगल लावलेली आहे. ब्राह्मण कधी गुरुनानक, महावीर, बुद्ध, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी तिथीचा आग्रह धरतात का? तो समाज जागा असल्यामुळे ब्राह्मण हे धाडस करत नाहीत. ब्राह्मणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीसाठी तिथीचा आग्रह धरावा, काय होते ते पाहा.

मित्रहो, एका ठिकाणी शिवचरित्राव व्याख्यानासाठी गेलो असताना तारीख-तिथीच्या वादावरुन दोन पक्षांच्या कार्यकर्त्यात प्रचंड वादावादी चालू होती हा प्रसंग पाहून खूप वाईट वाटले. शिवचरित्रावर विचार करण्याऐवजी जयंतीचा वाद कार्यकर्ते करत होते. यामागे बहुजनांचे अज्ञान तर ब्राह्मणांचा क्रूरपणा आहे. पण दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना शिवजयंतीच्या तारीख तिथीच्या वादाचे मुळ जेव्हा समजले तेंव्हा सर्व मतभेद विसरुन सर्वांनी १९ फेब्रुवारीला शिवजयंती जोरदार साजरी केली.

## शिवाजीराजांवर वार करणारा कृष्णा भास्कर कुलकर्णी

अफजलखान हा राजांच्या भेटीच्या निमित्ताने ठार मारण्यासाठी आलेला आहे. ही खात्रीलायक बातमी रुस्तुमेजमानने राजांना सांगितली. अफजलखान विजापुरहून थेट वाईत आला. तो तुळजापूर किंवा पंढरपूरला गेला नाही. (*संदर्भ-सेतू माधव पगडी लिखित शिवचरित्र एक अभ्यास*) भावना भडविण्यासाठी खानाने मुर्तीची विटंबना केली, असा जाणीवपूर्वक खोटा इतिहास लिहिला गेला. अफजलखान वाईत आल्याबरोबर वतनासाठी वाईचे ब्राह्मण खानाला भेटले. व शिवरायांना ठार मारण्यासाठी सर्व प्रकारे सहकार्य करण्याचे त्यानी खानाला नभिवचन दिले, या प्रसंगी खानाचा वकील मुसलमान नव्हता, तर कृष्णा भास्कर कुलकर्णी हा होता. त्याने राजांची अनेक गुपिते खानाला सांगितली. प्रत्यक्ष अफजलखान भेटीच्या प्रसंगी राजांच्या अंगावर चिलखत असल्याने राजांचे प्राण वाचले. राजांनी खानाला ठार मारले. याप्रसंगी कृष्णा भास्कर कुलकर्णीने राजांच्या कपाळावर तलवारीचा वार केला. (*संदर्भ ब.मो पुरंदरे लिखित- राजा शिवछत्रपती*) राजांच्या अंगात चिलखत आहे, याची खात्री कुलकर्णीला झाली होती. म्हणूनच कुलकर्णीनी राजांच्या कपाळावर वार केला. राजांच्या संपूर्ण आयुष्यात कोणीही राजांना जखम करु शकला नाही. आग्रा, पन्हाळा, शाईस्तेखान हल्ला या प्रसंगी राजांच्या केसालाही धक्का लागला नाही. अफजलखान, दिलेरखान, औरंगजेब, सिद्धी, सैय्यद बंडा यांनादेखील राजांना जखम करण्यात यश आले नाही. ते काम कृष्णा कुलकर्णीने केले. कुलकर्णीला खात्री होती की राजा आपणाला ठार मारणार नाही. कारण ब्रह्महत्या पाप आहे. हे ग्रंथात लिहिलेले आहे. पण राजांनी कपाळावर वार करणाऱ्या दहशतवादाचे मूळ कृष्णा कुलकर्णीचे तुकडे-तुकडे केले. म्हणजे राजांनी ग्रंथप्रामाण्य नाकारले. भूमिपुत्रांचे स्वराज्य निर्माण करणाऱ्या राजांवर कुलकर्णीने पहिला वार केला होता. याप्रसंगी सिद्धी इब्राहिम हे राजांचे अंगरक्षक होते. राजांवर वार करणाऱ्या सय्यद बंडाला ठार मारणारे जिवाजी महाले हे राजांचे निष्ठावंत अंगरक्षक होते, म्हणजे **मित्र कोण आणि शत्रू कोण?** याचा विचार वाचकांनीच करावा. अफजलखान कबरीबाबत टाहो फोडणारांनी विचार करावा की, अफजलखानाला

प्रतापगडापर्यंत येण्यास कोणी मदत केली? लेखकांनी राजांवर वार करणाऱ्या कृष्णा कुलकर्णीचा कृष्णाजी केला तर राजांचे रक्षककरणाऱ्या जिवाजी महालेंचा जिवा केला.

## शिवरायाविरुद्ध लढणारी रायबाघीण देशमुख

शिवाजीराजे पन्हाळगडावर अडकल्यानंतर शाईस्तेखान पुणे येथे आला. शाईस्तेखानला विजय मिळविण्यासाठी रायबाघीण देशमुख *(ब्राह्मण)* ही कारतलबखानाच्या खांद्याला खांदा लावून राजांच्या विरुद्ध लढली. उमरखिंडीत राजांच्या सैनिकांनी तिचा पराभव केला. तरीदेखील रायबाघीण मयेपर्यंत राजांच्या विरुद्ध लढली. याचा अर्थ ब्राह्मणांना राजांच्या स्वराज्यापेक्षा औरंगजेब-आदीलशहाचे राज्य हवे होते.

रायबाघीणचा पती उदाराम देशमुख हा देखील मोघलांचा सरदार होता. त्याच्या अकाली निधनामुळे रायबाघीणीला मोघलांनी सरदारकी बहाल केली होती. म्हणूनच रायबाघीण मोघलांची मर्जी राखण्यासाठी राजांना विरोध करीत होती. कारतलबखानाच्या खांद्याला खांदा लावून लढणारी रायबाघीण शाईस्तेखानाची हितचिंतक होती.

## दिलेरखानाच्या यशासाठी कोटीचंडीयज्ञ करणारे ४०० ब्राह्मण

शिवाजीराजांचा पराभव करण्यासाठी जयसिंगसह दिलेरखान लाखो सैनिक घेऊन पुरंदरला आला. दिलेरखानाला यश मिळावे यासाठी पुणे येथे ४०० ब्राह्मण दिलेरखानाला भटले व कोटीचंडीयज्ञ करण्याचा सल्ला दिला. राजांचे स्वराज्य संपावे आणि दिलेरखानचा विजय व्हावा यासाठी ४०० ब्राह्मण कोटीचंडी यज्ञाच्या अनुष्ठानास बसले. यावेळी दिलेरखानाकडून २ कोटी होन *(सहा कोटी रु.)* या ब्राह्मणांनी घेतले. म्हणजे विजय कोणाचा का होईना आपल्याला पैसा मिळावा व शिवाजी-दिलेरखान यांचे युद्ध व्हावे ही वृत्ती असणारे ब्राह्मण हेच राजांचे शत्रू होते. या यज्ञामुळेच दिलेरखानाला प्रेरणा मिळाली व राजांचा दारुण पराभव झाला. *(संदर्भ-सभासद लिखित श्री.शिवप्रभुंचे चरित्र)*

या ठिकाणी शिवरायांची अत्यंत महत्वाची भूमिका प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे राजांनी कोटीचंडीयज्ञ केला नाही. पुण्यातील ब्राह्मणांना दिलेरखानापेक्षा राजांच्या राजगडाचे अंतर जवळ होते, पण दिलेरखानाची भेट त्यांनी का घेतली? याचा अर्थ राजांनी यज्ञ करावा असा प्रयत्न ब्राह्मणांनी केला

असावा. पण राजांनी यज्ञ करण्यास साफनकार दिला. याचा अर्थ राजांचा या खुळचट विधीवर विश्वास नव्हता, हे स्पष्ट होते. यज्ञ, अभिषेक, सत्यनारायण, पुजा-अर्चा, ग्रंथ पठणाने समस्या सुटणार नाहीत. याची पूर्ण जाणीव राजांना झाली होती. त्यामुळे राजांकडून पैसा उकळण्याचा पुरोहितांचा डाव यशस्वी झाला नाही. म्हणजे ब्राह्मणांचे लक्ष पैसा, सत्ता आणि संपत्तीवर असते. त्यासाठी ते कोणाचीही बाजू घेतात आणि भांडण लावून स्वत:चे हित साधतात. म्हणूनच शिवाजीराजांना संपविण्यासाठी पुण्यातील ब्राह्मणांनी दिलेरखानाची बाजू घेतली. कारण त्यांना वाटले असावे की, दिलेरखान-जयसिंगाच्या झंझावातापुढे राजांचा निभाव लागणार नाही. म्हणून यशस्वी मोगलांनाच सहकार्य करावे. पण राजांनी तहान्वये विजय मिळवला. आणि पुढे जेव्हा राजांचा यशाचा आलेख वाढत गेला. तेव्हा ब्राह्मणांनी राजांची बाजू घेतली. पण या सहकार्यामागे पूर्ण ढोंगीपणा होता. हे राज्यभिषेकाच्या प्रकाराने जाणवले.

### औरंगजेबाच्या पदरी असणाऱ्या जयसिंगाचा सचिव उदयराज

उदयराज नावाचा ब्राह्मण राजा जयसिंगाचा सचिव होता. त्याने जयसिंगाला विष देऊन मारले. जयसिंगाचे महत्त्वाचे दप्तर त्याने पळवले. तो पुढे औरंगजेबाकडे गेला आणि मुसलमान झाला. उदयराजचा तालियारखान झाला. याचाच मुलगा हिदायतखान पुढे मोगलांच्या पदरी होता. खोबरे तिकडे चांगभले ही ब्राह्मणांची संस्कृती आहे.

### औरंगजेबाचा प्रधान रघुनाथदास

रघुनाथदास नावाचा ब्राह्मण औरंगजेबाचा प्रधान होता. शिवरायांचे राज्य संपावे यासाठी तो नेहमी प्रयत्नशिल होता. औरंगजेबाबद्दल प्रेम म्हणून तो बादशहाकडे नव्हता. पद आणि पैसा मिळावा म्हणून तो बादशहाकडे होता. ब्राह्मणांचे प्रेम फक्त पैसा आणि ब्राह्मणी व्यवस्थेवर असते, त्यासाठी ब्राह्मण वाटेल ती नाटके करतात. प्रतिगामी बरोबरच पुरोगामीपणाचे देखील ते नाटक करतात, पण आतून पुरोगामी, प्रतिगामी, विज्ञानवादी, दैववादी असे सर्व ब्राह्मण एकत्र असतात.

### औरंगजेबाचा शिवनेरीवरील किल्लेदार आबाभट

आबाभट नावाचा ब्राह्मण औरंगजेबाच्या पदरी शिवनेरीचा किल्लेदार होता. शिवरायांनी शिवनेरी जिंकण्यासाठी आबाभटावर हल्ला केला. तेंव्हा प्राण वाचविण्यासाठी किल्ला ताब्यात देतो

असे तो राजांना म्हणाला. आबाभटाने किल्ला तर दिला नाहीच याउलट तो औरंगजेबाकडे पळून गेला आणि मुसलमान झाला. आबाभटाचा अब्दुल अजीझ झाला पण आजचे ब्राह्मण प्रचार करतात की,' अगर शिवाजी नही होते तो सबकी सुन्नत होती'! मग सांगा, शिवाजीराजे असताना आबाभटाने सुन्ता का केली? शिवाजीराजांचे नाव घेऊन भारतीयांना भीती दाखवायची आणि स्वत: आतून मुस्लिमांशी संबंध ठेवायचा ही हजारो वर्षापासून ब्राह्मणांची चाल आहे. त्यामुळे मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन आपले शत्रू नसून ब्राह्मण हेच भारतीयांचे खरे शत्रू आहेत.

## सिद्धीला मदत करणारे मुरगुड नांदगांव येथील जोशी

शिवरायांच्या जीवनातील सर्वात मोठे शल्य म्हणजे राजांना जंजिरा किल्ला कधीच जिंकता आला नाही. राजांनी अनेक वेळा प्रयत्न केला. पण राजांना यश आले नाही. तरीही राजे नाउमेद झाले नाहीत. जंजिरा किल्ला राजांना का जिंकता आला नाही? त्यामागे काय कटकारस्थान शिजले होते? याचा थोडा शोध घेणे अत्यंत महत्वाचे आहे. मुरगुड नांदगांव येथील जोशी हा सिद्धिच्या पाठीशी होता. म्हणूनच राजांना जंजिरा जिंकता आला नाही. त्या जोशीने सिद्धीला किल्ला बांधण्याचा सल्ला दिला होता व त्याला पायाभरणीचा मुहूर्त सांगितला. त्याप्रमाणे सिद्धीने *(हबशीने)* केले. जोशीने हबशीला सांगितले, की **'तू किल्ला मुहूर्तावर बांधला आता जंजिरा ३०० वर्षे तुझ्याकडेच राहील. कोणालाही तो जिंकता येणार नाही!'** म्हणजे दक्षिणेच्या रुपाने अमाप पैसा मिळविणाऱ्या जोशीला राजांपेक्षा सिद्धीची जास्त काळजी होती. कारण त्या जोशीने दिलेल्या वरदानामुळेच जंजिऱ्याचा सिद्धी निर्ढावला होता. त्याने संभाजीराजांना देखील खूप त्रास दिला. जोशीच्या वरदानामुळेच सिद्धीचा आत्मविश्वास वाढला. तर स्वराज्यात भिती निर्माण झाली. कारण त्या काळात राजे विज्ञाननिष्ठ होते, पण सामान्य जनतेवर देवा-धर्माचा पगडा होता. म्हणूनच जंजिरा जिंकताना मावळ्यांच्या (सैनिकांच्या) मनात भीतीचे वातावरण होते. भिती असणारे सैनिक जास्त संख्येने आणि शस्त्रसज्ज असले तरीही विजय मिळवू शकत नसतात. राजांना जोशीची कटकारस्थाने माहिती होती तरी देखील राजांना या थोतांडाकडे दुर्लक्ष केले. आणि जंजिऱ्यावर हल्ला केला. पण राजांना जंजिरा जिंकता आला नाही. जंजिऱ्यापेक्षा कितीतरी कठीण किल्ले राजांनी जिंकले होते. पन्हाला तर कोंडाजी फर्जंदनी फक्त ५० माणसे घेऊन जिंकला होता, पण जंजिरा जिंकण्यासाठी लाखो रुपये खर्च केले, हजारो सैनिक धारातीर्थी पडले, पण किल्ला सिद्धीकडेच राहिला, या अपयशाचे कारण आहे मूरगुड नांदगांवचा जोशी! सिद्धीला यश मिळण्यासाठी प्रयत्न करणारा व समाजमनावर भीतीचे वातावरण निर्माण करून न्यूनगंड निर्माण करणारा जोशी हाच स्वराज्याचा व शिवाजीराजांचा खरा शत्रू होता.

मुरगुड नांदगांव येथील जोशींचे जसे राजांवर प्रेम नव्हते, तसेच सिद्धीवर देखील नव्हते. तरीदेखील सिद्धीला जंजिरा बांधण्यासाठी जोशने मुहूर्त-पंचांगाव्दारे मदत केली. या माध्यमातून जोशीला खूप धनसंपत्ती मिळाली, म्हणूनच त्याने सिद्धीला मदत केली. म्हणजे ब्राह्मण फक्त अर्थसत्ता मजबूत करणे हा उद्देश असतो. त्यासाठी जोशीने पंचांगाव्दारे ब्राह्मणी व्यवस्था घट्ट् करण्याचा प्रयत्न केल. ५०० वर्षे किल्ला अजिंक्य राहील असे वरदान देणाऱ्या जोशीने एका अर्थाने भविष्यशास्त्राचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. भविष्यशास्त्र हे ब्राह्मणांना जगण्याचे व बहुजन समाजाला कायमचे गुलाम बनविण्याचे शास्त्र आहे. म्हणजे जोशीने सिद्धीकडून अमाप संपत्ती तर उकळीच, पण बहुजन समाजाला ५०० वर्षांची भिती जोशीने दाखविली. शिवाजीराजांनाच काय पण त्यांच्या कोणत्याही पिढीला जंजिरा जिंकता येणार नाही हा विषारी ब्राह्मणी विचार बहुजनांच्या मानगुटीवर जोशीने कायमचा बसविला.

पण या ठिकाणी अत्यंत महत्वाची बाब म्हणजे किल्ला जिंकण्यासाठी शिवाजीराजांनी प्रयत्न केले. त्यानंतर संभाजीराजांनीदेखील जंजिऱ्याची महत्वाकांक्षी योजना हाती घेतली. पण अचानक औरंगजेबाचे महाराष्ट्रवर आक्रमण झाल्यामुळे संभाजीराजांना ही मोहीम अर्ध्यावर सोडावी लागली. अथवा संभाजीराजांनी या क्रुर ब्राह्मणी व्यवस्थविरुद्ध लढा उभारला असता.

### मथुरेतील ब्राह्मणांना शिवाजीराजांनी 'दम' दिल्यामुळेच संभाजीराजे सुरक्षित

शिवाजीराजे आग्रा कैदेत अडकल्यानंतर महाराष्ट्रात थांबलेले व दिलेरखान यांना ब्राह्मणांनी खूप मदत केली. तरी देखील अशा कठिण प्रसंगी जिजामातांनी खंबीरपणे स्वराज्याचे रक्षण केले. एकही किल्ला जयसिंगाला जिंकता आला नाही. इंचभर भूमिदेखील मोगल-आदीलशहा यांना जिंकू न देणाऱ्या जिजाऊ मॉसाहेबांसारख्या निर्भीड माता राजांच्या पाठीशी होत्या म्हणून राजे आग्रा येथून वेषांतर करुन निसटले. *(राजे पेटाऱ्यातून नव्हे, तर वेषांतर करुन निसटले.)* याप्रसंगी राजांच्या मनावर किती दडपण असेल? दूरचे अंतर, प्रवासाची साधने नाहीत, पावलोपावली शत्रू आहेत, सोबत नऊ वर्षाच्या सुपूत्र संभाजी आहे. अशा प्रसंगी संभाजीला ठेवायचे कोठे? हा प्रश्न राजांपुढे होता. त्यावेळेस मोरोपंत पिंगळेचे नातेवाईक मथुरेत होते. तेथे संभाजीला ठेवण्याचा निर्णय राजांनी घेतला. पण राजांना भिती होती की पैशाच्या अभिलाषेने हे ब्राह्मण कदाचित संभाजीला शत्रूच्या स्वाधीन करतील. कारण राजे ब्राह्मणांना चांगलेच ओळखून होते. कितीही जिवलग मैत्री असली तरी स्वार्थासाठी ब्राह्मण कसा गळा घोटतात हा त्यांचा प्राचीन काळापासूनचा इतिहास राजांना चांगलाच माहित होता. राजांनी संभाजीला त्रिकमलच्या स्वाधीन केले. त्या प्रसंगी राजांना त्रिमल बंधूंना **'संभाजीच्या जीवास धोका झाल्यास तुमचा प्राण घेईन'** असा इशारा राजांनी त्यांना दिला. त्याचप्रमाणे संभाजीला देखील

एकांतात बरेच मार्गदर्शन केले आणि राजे परत आले. अफजलखान, शाईस्तेखान, जयसिंग आणि औरंगजेबाची फजिती करणारे शिवाजीराजे आपला वंशही शिल्लक ठेवणार नाहीत याची भिती त्रिमल बंधूंना वाटत होती. म्हणूनच संभाजीराजांशी त्यांनी दगा फटका केला नाही. म्हणजे त्रिमलांनी संभाजीराजांना प्रेमामुळे नाही तर भितीमुळे सांभाळले होते. *(संदर्भ-छ.संभाजी स्मारक ग्रंथ, पृ.१७८-डॉ. जयसिंग पवार)*

## राजारामाच्या जन्मावेळी शिवरायांना भीती दाखविणारे धर्ममार्तंड

शिवरायांना सोयराबाईच्यापोटी २४/२/१६७० राजाराम नावाचा मुलगा झाला. मुलाचा जन्म पालथा झाला होता. त्याप्रसंगी एका पंडिताने राजांना भीती घातली की, पालथे जन्मणे अशुभ आहे. राजांना भीती घालून यज्ञ, अभिषेक, सत्यनारायण, पूजा-अर्चा, अनुष्ठान करावयास लावायचे व राजांकडून पैसा, सोने उकळायचे हा डाव त्या पंडिताचा होता. पण राजे हे खरेच जाणते *(जाणणारे)* राजे होते. त्यांनी त्या पंडिताचा गुपित कावा ओळखला. राजे त्या पंडिताला म्हणाले, **ज्याअर्थी माझा मुलगा पालथा जन्मला त्याअर्थी तो दिल्लीची पातशाही पालथी घातल्याशिवाय राहणार नाही.** असे राजे म्हटल्यावर तो पंडित थंडच पडला. कारण राजे आपल्याला वश होत नाहीत याची त्याला खात्री पटली. पण राजांना पावलोपावली भीती घालण्याचा व नाउमेद करण्याचा प्रयत्न ब्राह्मणांनी केला आहे. औरंगजेब, आदीलशहा, सिद्धी, पोर्तुगीज, डच, अफजलखान, दिलेरखान, शाईस्तेखान हे राजांचे उघड शत्रू होते, ते राजकीय शत्रू होते *(धार्मिक नव्हे).* त्यांच्या विरुद्ध राजे डावपेच आखत होते. त्यांना राजांनी अनेकवेळा पराभूत केले. पण मित्राचे सोंग घेऊन बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवरायांचा काटा काढणारे ब्राह्मण हेच राजांचे खरे शत्रू आहेत. कारण त्यांच्याविरुद्ध राजांना डावपेच आखता येत नव्हते. म्हणूनच त्यांनी राजांचा अवसानघात केला. म्हणूनच राजांना पुरंदरचा तह करावा लागला व आग्रा येथे जावे लागले. आणि कैदेत अडकावे लागले.

## बापूखानाला मदत करणारा नागोजी पंडित

बापूखान हा आदीलशहाचा पन्हाळ्यावरील किल्लेदार होता. पन्हाळा जिंकण्यासाठी शिवरायांनी कोंडाजी फर्जंद यांना पाठविले. कोंडाजींनी बापूखानावर हल्ला केला त्या प्रसंगी नागोजी पंडित नावाचा ब्राह्मण आदीलशहाच्या पदरी बापूखानाचा मदतनीस म्हणून काम करत होता.

बापूखानाचा पराभव झाल्याचे समजल्याबरोबर नागोजी पंडित पळाला. चरायला पुढे आणि मरायला मागे त्याला पंडित म्हणतात. पैसा आणि पदासाठी ब्राह्मण कोणशीही तडजोडी करतात व देशात दंगली घडवितात.

## शिवरायांच्या राज्याभिषेकाला हिंदूधर्माचा उर्फ ब्राह्मणधर्माचा विरोध

मोगल, आदीलशहा, इंग्रज आणि पोर्तुगाल यांच्या जोखडातून देशबांधवांना मुक्त केल्यानंतर शिवरायांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. परकीय सत्ता राजांना शहाजीराजे या जहागीरदाराचा बंडखोर पुत्र समजत. तर ब्राह्मण राजांना राजा मानावयास तयार नव्हते. इतर राजांशी तह-वाटाघाटी करताना अडचणी येत. या अडचणी दूर करण्यासाठी व बहुजन देखील स्वत:चे स्वतंत्र राज्य व राजा निर्माण करु शकतात. हा आत्मविश्वास निर्माण करुन हजारो वर्षाची गुलामगिरी संपविण्यासाठी शिवरायांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला.

शिवरायांनी राज्याभिषेकाची घोषणा केल्याबरोबर राजांना हिंदुधर्माने कडाडून विरोध केला. आता हिंदूधर्म म्हणजे काय? हे समजून घेणे महत्वाचे आहे. हिंदूधर्माचे मुळचे नांव वैदिक धर्म आहे. वेद हे हिंदूधर्माचे धर्मग्रंथ आहे. जे वेद ब्राह्मण सोडून इतरांना वाचण्यास बंदी होती. वैदिक धर्मालाचा पुढे ब्राह्मणधर्म असे ही म्हटले जाऊ लागले. संपुर्ण बहुजनांचे सर्व क्षेत्रातील नेतृत्व करण्यासाठी ब्राह्मणांनी ब्राह्मणधर्म या नावाचा त्याग केला व हिंदू हे नांव धारण केले. आज जो हिंदूधर्म. हा मुळचा ब्राह्मणधर्म-वैदिक धर्म आहे. म्हणूनच हिंदूधर्माच्या कोणत्याही ग्रंथात हिंदू या शब्दाचा उल्लेख नाही. पण वेद, वैदिक, ब्राह्मण हे उल्लेख सर्वत्र सापडतात. हिंदुधर्मातील प्रमाणभूत ग्रंथ ब्राह्मणांनी लिहिलेले आहेत. त्यामुळे ते ब्राह्मणांच्या फायदाचे व बहुजनांची बदनामी करणारे आहेत. हिंदूत्व म्हणजे खरे ब्राह्मणत्व आहे. हिंदूत्वासाठी जोशी, कुलकर्णी, देशपांडे, भिडे, ठाकरे, एकबोटे कधीच मरत नसतात. पण हिंदुत्वाच्या नावांखाली जेंव्हा सत्ता येते तेंव्हा सर्व मुख्य जागा ब्राह्मण बळकावतात. मरायला मराठे आणि चरायला मनुवादी सराटे म्हणजेच हिंदुत्व होय. हिंदू ही परकीयांनी पराभूत भारतीयांना दिलेली उपाधी आहे. हिंदू याचा अर्थ दास, गुलाम आणि पराभूत! म्हणून औरंगजेबाने जेंव्हा भारतीयांना जिझिया कर सुरु केला तेव्हा ब्राह्मणांचे एक शिष्टमंडळ औरंगजेबाला जाऊन भेटले आणि म्हणाले, आम्ही जिझिया कर भरणार नाहीत तेव्हा औरंगजेबाने विचारले, का? तेव्हा ब्राह्मण म्हणाले आम्ही भारतीय नाही. आम्ही देखील तुमच्यासारखे परदेशातून आलेलो आहोत. त्यामुळे आम्ही भारतीय म्हणजेच हिंदू नाही. फार तर आम्ही तुम्हाला जिझिया कर हिंदूकडून वसूल करुन देतो! म्हणजे

पहा, ज्या ब्राह्मणांनी आपल्या पूर्वजांकडून जिझिया कर वसुल करून मोगलांना दिला. तेच ब्राह्मण आज हिंदुत्वाचे ठेकेदार आहेत. ते नेहमी आपल्यापुढे येऊन म्हणतात गर्व से कहो हम हिंदू है! म्हणजे गर्व से कहो हम पराभूत है। दास है। गुलाम है। हे आपल्याला म्हणायला लावतात.

**म्हणूनच बाळासाहेब ठाकरे यांचे वडील प्रबोधनकार ठाकरे म्हणतात. हिंदूधर्म हे बिनबुडाचे पिचके गाडगे आहे. हिंदूधर्म हे एक भटी गौडबंगाल आहे. बहुजनांना फसविणारा धर्म म्हणजे हिंदूधर्म आहे. बहुजनांना लुटणासाठी हिंदूधर्मातील मंदीरांचा नंबर पहिला आहे. हिंदूधर्मातील पुराणं म्हणजे शौचकूप (संडास) आहे. बहुजनांना गुलाम करण्यासाठी हिंदूधर्मात भटांनी अनेक ग्रंथ लिहिले.** (संदर्भ-देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे) तात्पर्य हिंदूत्व म्हणजे ब्राह्मणत्व आहे. ज्यावेळेस आपण खरी सत्ता मिळवतो. तेंव्हा हिंदूत्ववादी म्हणजेच ब्राह्मण ती सत्ता वापरण्यास विरोध करतात.

शिवरायांनी राज्याभिषेकाची घोषणा करताच सर्व ब्राह्मणांनी शिवरायांना शूद्र म्हणून विरोध केला. परशूराम नावाच्या ब्राह्मणाने पृथ्वीवरील सर्व क्षत्रिय २१ वेळा ठार मारलेले आहेत. त्यामुळे एकही क्षत्रिय शिल्लक नाही. ब्राह्मण सोडून सर्वजण शूद्र आहेत. शूद्राला राजा होण्याचा अधिकार नाही. अशी ओरड ब्राह्मणाने मुस्लिम राजाला विरोध केला नाही. याउलट मुस्लिमांच्या दरबारात ब्राह्मण अधिकाऱ्यांचा भरणा होता. म्हणजे मुस्लिमांना आनंदाने राज्य करू देणारे ब्राह्मण शिवरायांच्या विरुद्ध एकजात उठले. तेव्हा शिवरायांना वाटले, सर्व ब्राह्मणांनी विरोध केला तरी सहकारी मित्र असणारे मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो इ. ब्राह्मण मित्र मंत्री सहकार्य करतील. पण राजांचा अपेक्षाभंग झाला. मोरोपंत पिंगळे भर दरबारात राजांना म्हणाला, तुम्हा शूद्र मराठ्यांच्या हाताखाली आम्ही ब्राह्मणांनी कसे काम करावे? सहकारी असणाऱ्या ब्राह्मणांनी देखील शिवरायांना तोंडावरच विरोध केला. म्हणजे ब्राह्मण हा ब्राह्मणच असतो. हे सर्व पंताने दाखवून दिले. ब्राह्मण मित्र जरी असला तरी आणीबाणीचा प्रसंग येताच ब्राह्मण पाठीत खंजीर खुपसतो. हे मोरोपंताने दाखवून दिले. सर्व ब्राह्मणांनी शिवरायांना त्रास द्यायला सुरुवात केली. ज्या शिवरायांनी सर्व ब्राह्मण सहकाऱ्यांना जिवापाड जपले, संकटसमयी प्रत्येकाला मदत केली. तेच ब्राह्मण शिवरायांशी वैऱ्यासारखे वागु लागले. स्वराज्यातील व बाहेरील सर्व ब्राह्मण एक झाले. म्हणजे ब्राह्मण कोणत्याही गटात, पक्षात, संघटनेत, संस्थेत, पंथात असले तरी आतून सर्व ब्राह्मण एक असतात. हे राज्याभिषेकप्रसंगी सिद्ध झाले. परदेशातून आलेल्या ब्राह्मणांनी स्वत:च्या हितासाठी लिहिलेल्या बनावट पोथ्या-पुराणांचा आधार घेऊन शिवरायांच्या राज्याभिषेकाला विरोध केला. शिवरायांच्या राज्याभिषेकाला धर्मसंहिता व पुरोहितच मिळू द्यायचा नाही असा चंग देशातील सर्व ब्राह्मणांनी बांधला. तरीदेखील राज्याभिषेकाचा निर्णय राजांनी ठामपणे घेतला.

अशा प्रकारे शिवरायांच्या राज्याभिषेकाला ब्राह्मणधर्माने म्हणजेच हिंदूधर्माने कडाडून विरोध केला. आणि वरुन शिवरायांना हिंदूधर्मरक्षक, हिंदवी स्वराज्य संस्थापक म्हटले जाते. ही शिवरायांची क्रूर चेष्टा आहे. ज्यांनी विरोध केला. त्यांचे राज्य राजांना अपेक्षित असेल का? **शिवरायांचा हिंदु, हिंदवी, हिंदुत्व याचेशी अजिबात संबंध नाही. शिवचरित्रात कोठेही हिंदू, हिंदवी आणि हिंदुत्व याचा उल्लेख नाही.** शिवरायांचा वापर करण्यासाठी नंतर ते शिवचरित्रात घुसडण्यात आले. शिवरायांनी बहुजनांचे स्वराज्य निर्माण केले. शिवाजीराजे जर हिंदूत्वासाठी लढले, तर मग हिंदुंनी राज्याभिषेकाला विरोध का केला? राज्याभिषेकाला सर्व ब्राह्मणांनी विरोध केला तेंव्हा सर्व बहुजन समाज शिवरायांच्या पाठीशी उभा राहिला. सर्व मराठे देखील शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. एकही मराठा राजांच्या विरोधात नव्हता. म्हणजे यापुर्वी शिवरायांना ज्या मराठ्यांनी विरोध केला तो अज्ञानामुळे केला. रामदासाचे ऐकून केला.

## राज्याभिषेकप्रसंगी हिंदूधर्माने शिवरायांचा केलेला छळ

१६६८ पासून शिवाजीराजांनी रायगडावर राजधानी केली होती. रायगड हा अत्यंत कठीण व सुरक्षित असा किल्ला आहे. कडे ताशीव व उंच आहेत. गडाची लांबी ४ कि मी. व रुंद १ कि मी. आहे. गडाभोवती कठीण डोंगररांगा आहेत. कोणत्याही शत्रूला रायगड जिंकणे अशक्य आहे. असा रायगड शिवरायांनी राजधानीसाठी निवडला. गडावरील बांधकाम शिवरायांनी स्वतः करून घेतले. स्वराज्यातील अनेक किल्ले शिवरायांनी स्वतः बांधले. शिवाजीराजे उत्तम स्थापत्यतज्ञ (इंजिनिअर) होते.

अशा रायगडावर राज्याभिषेक करण्याचा राजांनी निर्णय घेतला. राज्याभिषेकदिन जसा जवळ येऊ लागला. तशी ब्राह्मणांची कटकारस्थाने सुरु झाली. पण राजमाता जिजाऊमाँसाहेब शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या. याप्रसंगी जिजाऊंचे वय ७६ वर्षाचे होते. या वयातही जिजाऊंचे धैर्य, करारीपणा तेजस्वी होता. राज्याभिषेकाला एकही पुरोहित मिळू द्यायचा नाही. असा चंग देशातील सर्व ब्राह्मणांनी बांधला. याप्रसंगी कायस्थ प्रभू असणारे बाळाजी आवजी यांनी पुरोहिताचा शोध सुरु केला. ब्राह्मण-कायस्थांचे हाडवैर असल्यामुळे कायस्थ राजांच्या बाजुला होते. बाळाजी आवजीने महाराष्ट्र ातील सर्व भटजींना पौरोहित्यासाठी विचारले, सर्वांनी शिवाजी शूद्र आहे. आम्ही येणार नाही असे कळविले. तेंव्हा बाळाजी आवजीने गागाभट्टाला बोलाविण्यासाठी केशवभट, भालचंद्रभट आणि सोमनाथ या तीन ब्राह्मणांना काशीला पाठविले. गागाभट्टाने या तिघांजवळ शिवाजी शूद्र असल्यामुळे मी येणार नाही, असे स्पष्ट कळविले. (*मित्रहो, ब्राह्मण आपल्या देशात येण्यापूर्वी कोणीही हलके नव्हते, कोणीही सवर्ण नव्हते, सर्वजण समान होते. पण आपल्यावर राज्य करण्यासाठी ब्राह्मणांनी वर्ण, जाती*

*निर्माण केल्या व स्वत:कडे श्रेष्ठत्व घेतले. याचा प्रसार करण्यासाठी ब्राह्मणांनी ग्रंथ लिहिले. त्यालाच हिंदूधर्माचे ग्रंथ म्हणतात. या ग्रंथानीच शिवरायांना शूद्र ठरविले. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे विदेशी आर्यांचे वर्ण आहेत. मुळचे भारतीयांना आर्यांनी शूद्र घोषीत केले.)*

केशवभट, भालचंद्रभट, सोमनाथभट आणि गागाभट या चार भटात गुप्त कट झाला असल्यामुळे बाळाजी आवजीने आपल्या विश्वासातील कायस्थ असणाऱ्या निळो येसाजीला पुन्हा: गागाभट्टाकडे पाठविले. याप्रसंगी शिवरायांचे मूळ घराणे उदयपूरचे असल्याची बनावट कागदपत्रे बाळाजीने गागाभट्टाकडे पाठवली. शिवाजीराजांच्या भोसले घराण्याचा राजस्थानाशी कसलाही संबंध नसून भोसले घराणे मुळचे महाराष्ट्रातील वेरुळचेच आहे. हे बाळाजीला आणि गागाभट्टाला चांगले माहित होते. बाळाजीने पैशाचे आमिष दाखविताच गागाभट्ट सर्वग्रंथ गुंडाळून रायगडाच्या पायथ्याजवळील पाचाडात आला. ब्राह्मण हे ग्रंथांचे व देवांचे बाप (निर्माते) असल्यामुळे गागाभट्टाला ग्रंथप्रामाण्यापेक्षा पैसा महत्त्वाचा वाटला.

गागाभट्ट पाचाडात आल्याबरोबर मोरोपंत पिंगळेने गागाभट्टाची भेट घेतली व राज्याभिषेक झाला तर ब्राह्मणांचे वर्चस्व संपेल व शिवाजी श्रेष्ठ ठरेल, त्यामुळे राज्याभिषेक करू नये. असा सल्ला गागाभट्टाला दिला. गागाभट्टाने लगेच सरड्यासारखा रंग बदलला. शिवरायांना राज्यभिषेक करण्यास नकार दिला.

शिवाजीराजे शुद्र असल्यामुळे त्यांच्या ऐवजी बाळाजी आवजीला राज्याभिषेक करण्याचा गागाभट्टाने निर्णय घेतला. म्हणजे राज्य निर्माण केले शिवरायांनी व निर्णय घेतो भटजी. कायस्थांची राजांवर नितांत श्रद्धा असल्यामुळे शिवाजीराजे आणि कायस्थात फूट पाडण्यासाठी गागाभट्टाने हा डाव टाकला. बहुजनांतील कर्तृत्त्वान नेतृत्त्व संपविण्यासाठी निष्क्रिय माणसाला नेते पद देणे व सूत्र हातात घेणे. हा एक ब्राह्मणांचा नेहमीच डाव असतो. यासाठी गागाभट्टाने बाळाजी आवजीचे नांव पुढे केले. पण मोरोपंत पिंगळेसह सर्व ब्राह्मणांचे आणि कायस्थ बाळाजी आवजीने हाडवैर असल्यामुळे बाळाजी आवजीचेही नांव मागे पडले. राज्याभिषेकासाठी बाळाजीआवजीपेक्षा शिवाजीराजांकडूनच अधिक पैसा मिळेल व बाळाजी आवजीला राज्याभिषेक केला तर शिवाजीराजे व सर्व प्रजा ब्राह्मणाला कापल्याशिवाय राहणार नाहीत या भितीमुळे व पैशाच्या अभिलाषेने शिवरायांना राज्याभिषेक करण्याचे निश्चित झाले. प्रथम बाळाजी आवजीला क्षत्रिय म्हणून राज्याभिषेक करण्याचा निर्णय घेणाऱ्या गागाभट्टाने कायस्थ कसे हलके आहेत हे सांगण्यासाठी गागाभट्टीय नांवाचा ग्रंथ लिहिला. म्हणजे मोरोपंत पिंगळेच्या तालावर नाचणारा गागाभट्ट पदोपदी पगडी फिरवून सरड्यासारखा रंग बदलत होता.

शिवरायांनी रक्ताचे पाणी करुन स्वराज्य निर्माण केले. पण राजे श्रेष्ठ का कनिष्ठ आहेत. हे ठरविण्याचे काम ब्राह्मण करत होते. राज्याभिषेकाचा आनंददायी सोहळा पण ब्राह्मणांनी वाद उपस्थित केल्यामुळे गडावर व स्वराज्यात अत्यंत चिंतेचे व तणावाचे वातावरण होते. ज्यांना आपण आपले म्हणतो अशा भटांनी शिवरायांना प्रथमापासूनच विरोध केला होता. आता तर ते राजांच्या राज्याभिषेकाच्या विरोधात एकजात सर्वजण उभे राहिले.

बाळाजी आवजीने पैशाचे आमिष दाखविताच गागाभट्ट राज्याभिषेक करण्यास तयार झाला. आपल्याबरोबर अनेक भटांचा फायदा होईल अशी व्यवस्था गागाभट्टाने केली. राज्याभिषेकाचा दिवस निश्चित झाला. शिवरायांचे सर्व बहुजन सहकारी राज्याभिषेकाच्या तयारीला लागले. हिरोजी फर्जंद, मदारी मेहत्तर, हंबिरराव मोहिते, नागोजी जेधे, येसाजी कंक इत्यादी सहकारी आलेल्या पाहुण्यांची व्यवस्था करणे, साहित्य आणणे इ. कामे करु लागले. जिजाऊ स्वत:जातीने लक्ष देत होत्या. शिवरायांनी जिजाऊंचे दर्शन घेतले. राज्याभिषेकासाठी सर्व ब्राह्मणांनी घातलेला घोळ व केलेला विरोध यामुळे जिजाऊमाँसाहेब प्रचंड चिडलेला होत्या. धर्म- संस्कृतीच्या नांवाखाली भटांनी शिवरायांचा सुरु केलेला छळ यामुळे बहुजन समाज अस्वस्थ झाला होता. स्वत:ची स्वतंत्र धर्मसंहिता नसल्यामुळे वैदिकांच्या उर्फ ब्राह्मणांच्या म्हणजेच हिंदूच्या धर्मग्रंथावर राजांना अवलंबून रहावे लागले (*म्हणूनच आज शिवरायांच्या प्रेरणेतून शिवधर्मांची स्थापना झालेली आहे. १७व्या शतकात शिवधर्म असता तर भटांचा विरोध करण्याचे कारणच नव्हते. (हिंदू) धर्म हा भटांचा असल्यामुळे राज्याभिषेक प्रसंगी राजांचा छळ केला व अमाप पैसा लुटला.*)

राज्याभिषेकाप्रसंगी व्रात्यास्तोम करण्यासाठी गागाभट्टाने ७००० (सात हजार) होन घेतले. तर इतर ब्राह्मण पुरोहितांसाठी १७००० होन घेतले. राजांच्या ५ जूनच्या स्नानाच्या वेळी उपस्थित असणाऱ्या प्रत्येक ब्राह्मणाला १०० होन देण्यात आले. राज्याभिषेकाला ५०,००० (पन्नास हजार) ब्राह्मण उपस्थित होते. असे सभासद लिहितो. म्हणजे फुकट अन्न व होन मिळणार म्हणून कोणतीही प्रवासांची आधुनिक साधने नसताना देशातून पन्नास हजार ब्राह्मण रायगडासारख्या कठिण ठिकाणी आले होते. शिवरायांची सुवर्णतुला करण्यात आली. राजांचे वजन १६० पौंड म्हणजे १७००० होन झाले. ते होन, तूप, लोणी, साखर, फळे, सुपारी, रुपे, तांबे, लोखंड ब्राह्मणांनी घेतले. यासाठी अंदाजे ५०००० होन गेले.

७ जून राज्याभिषेकाच्या दुसऱ्या दिवशी प्रत्येक ब्राह्मणाला २ होन व ब्राह्मणस्त्री व ब्राह्मण मुले यांना प्रत्येकी १ होन घेतला. (एक होन म्हणजे ३ रुपये) म्हणजे ज्यांनी शिवरायांच्या राज्याभिषेकाला विरोध केला. त्यांनीच स्वराज्याची लूट केली. राज्याभिषेकास एकूण ४ कोटी २६ लाख

रुपये खर्च झाला. शिवरायांच्या संपुर्ण आयुष्यात स्वराज्यनिर्माण करण्यासाठी जेवढा पैसा खर्च झाला नाही. त्यापेक्षा अधिक पैसा ब्राह्मणांनी लुटला. शिवरायांच्या मावळ्यांनी रक्ताचे पाणी करुन कमावलेले होन मनुवादी कावळ्यांनी धर्माच्या नावाखाली राजरोसपणे पळविले.

शिवरायांच्या राज्याभिषेकाला शुभेच्छा देण्यासाठी डच, फ्रेंच, पोर्तुगाल, इंग्रज, मोगल, आदीलशहा, कुतूबशहा यांचे प्रतिनिधी मौल्यवान भेटवस्तू व नजराणे घेऊन आले होते. ज्या इंग्रजांच्या साम्राज्यावरचा सुर्य कधीही मावळत नाही असे म्हटले जाते अशा इंग्रजांचा प्रतिनिधी हेन्री ऑक्झिंडेन राज्याभिषेकाला शुभेच्छा देण्यासाठी उंचीवस्त्रे व अमुल्य भेटवस्तू घेऊन राजांपुढे नतमस्तक होऊन आला. भेटवस्तू दिल्या व राजांना मुजरा करुन मागल्या पावलाने दरबारातून बाहेर पडला. राजांकडे त्याने पाठ केली नाही. पण आपले म्हणून आपल्या कळपात घुसलेल्या ब्राह्मणांनी शिवरायांचा छळ केला. शिवरायांनी हा विरोध मोडून राज्याभिषेक पार पडला. आपल्या आईला, सर्व महाराण्यांना, गोर-गरीबांना राजांनी दरबाराता सन्मानाने बसविले. स्वराज्यात राज्याभिषेक सर्वांना पहाता यावा यासाठी राजांनी संकल्पित वेळेला सर्व गडावर तोफांचा आवाज केला. हा आवाज रयतेच्या कर्णपटलावर-मनपटलावर व नंतर नेत्रपटलावर उमटवला. क्रूर विरोधातून देखील राजांनी राजांनी राज्याभिषेक केला व हातात न्यायदंड व राजदंड घेतला. प्रजेला खूप आनंद झाला. ब्राह्मणांचे धाबे दणाणले.

राज्याभिषेकापासून शिवरायांनी नवा शिवशक सुरु केला. सर्व कारभार शिवशकाप्रमाणे सुरु झाला. (*हा शिवशक पुढे पेशव्यांनी बंद केला आणि मुस्लिमांचा फसली शक सुरु केला. शिवाजीपेक्षा पेशव्यांचे मुस्लिमसंस्कृतीवर जास्त प्रेम होते. म्हणजे मुस्लिमांचा अनुनय व त्यांच्या दाढ्या कुरवाळण्याचे काम ब्राह्मणांनी (पेशव्यांनी) केले. अशा पेशव्यांचा शनिवारवाडा महोत्सव साजरा करणे म्हणजे देशद्रोह आहे कारण शनिवारवाडा हा भारतीयांच्या पराभवाचे व पेशव्यांच्या व्यभिचाराचे प्रतिक आहे.*)

शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर गागाभट्टाचा मृत्यू झाला. त्याचे प्रेत एका शौचकूपात (संडासात) सापडले. तेंव्हा देशातील सर्व ब्राह्मणांनी प्रचर सुरु केला की, शिवाजीराजे शूद्र असतांना देखील गागाभट्टाने राज्याभिषेक केला म्हणूनच गागाभट्टाचा शौचकूपात पडून मृत्यू झाला. शिवरायांकडून मिळालेल्या पैशामुळे गागाभट्ट मातला व त्याने खाणे व दारु पिणे सुरु केले. नशेत तो मेला. तरी देखील शिवरायांना कमी लेखण्यासाठी ब्राह्मणांनी वरील प्रचार सुरु केला.

## शिवाजीराजे हिंदूधर्माचे की शिवधर्माचे?

शिवजीराजांनी अथक परिश्रमाने स्वराज्य निर्माण केले. जगातील कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला किंवा राजाला त्याच्या धर्माचे विधी करण्यास विरोध केला जात नाही. समता हे धर्माचे महत्त्वाचे मूल्य आहे. एकाच धर्मातील श्रेष्ठ आणि कनिष्ठ व्यक्तीला धर्माचे आचार, विचार, अध्ययन करण्याची परवानगी असते. शिवरायांनी तर आपले कर्तृत्व अविरत कष्टाने, चारित्र्याने, निष्कलंक वृत्तीने सिद्ध केलेले होते. तरी देखील त्याच धर्मातील ब्राह्मणांनी शिवरायांच्या राज्याभिषेकाला विरोध का केला? यावरुन एक बाब सिद्ध होते की शिवरायांचा व ब्राह्मणांचा धर्म एक नाही. धर्म एक असता तर ब्राह्मणांनी आनंदाने आणि फुकट राज्याभिषेक केला असता. याउलट त्यांनी राजांना खूप छळले. तेच हिंदूत्ववादी (*ब्राह्मण*) आज शिवरायांचे भांडवल करुन जगतात.

शिवाजीराजे महान पराक्रमी, बुद्धीमान, चारित्र्यसंपन्न, प्रजाहितदक्ष आणि न्यायी असताना देखील कोणत्या धर्माने राजांना शूद्र ठरविले? त्यांना शूद्र ठरवून त्यांचे कर्तृत्व नाकारणारा व परदेशातून आलेल्या आर्यब्राह्मणांना श्रेष्ठ ठरविणारा हिंदूधर्म राजांचा धर्म असू शकतो का?

हिंदूधर्माने भारतीयांच्या सृजनशिलतेवर कडक निर्बंध घातले. समुद्र ओलांडणे, शस्त्र धारण करणे, स्त्रियांना स्वातंत्र्य देणे, शिक्षण देणे, समता पाळणे यावर हिंदूनी (*ब्राह्मणांनी*) कडक बंधने घातली. शिवरायांनी ही बंधन तोडली. शिवरायांनी समुद्र ओलांडला, आरमारदल उभारले, बहुजनांच्या हातात अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रे दिली, स्त्रियांना स्वातंत्र्य दिले, स्वतः आईकडून शिक्षण घेतले, संभाजीराजांना शिक्षण दिले. हिंदूचे ग्रंथप्रामाण्य नाकारले व समतेवर आधारलेले स्वराज्य निर्माण केले. मग सांगा शिवाजीराजे कसे हिंदू ठरतात?

हिंदूत्व म्हणजे ब्राह्मणत्त्व आहे हे ओळखणारे जैन, बौद्ध, शिख ही आपली भावंड आहेत. त्यांनी वैदिकांचा म्हणजेच ब्राह्मणांचा क्रुरपणा ओळखला व जैन, बौद्ध आणि शीख हे ब्राह्मणी धर्मापासून स्वतंत्र झाले. जैन, बौद्ध, शीख धर्मात ब्राह्मणांना नाक खुपसण्याची संधी नाही. म्हणूनच या देशात जैन, बौद्ध आणि शिखांची प्रगती झाली. शिवाजीराजांनी देखील स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. राज्यव्यवहार कोशाची निर्मिती केली. शिवशक सुरु केला, स्वतंत्र शिवराई होन ही चलन पद्धती सुरु केली. स्वतंत्र राज्यकारभार, न्यायपालिका सुरु केली, शिवपूत्र संभाजीराजांनी धर्मचिकित्सा सुरु केली. भटांची सर्व कटकारस्थाने लक्षात आल्याबरोबर राजांनी स्वतंत्र व्यवस्थानिर्मिती सुरु केली. शिवाजीराजे जगले असते तर त्याचवेळी शिवरायांनी शिवधर्माची स्थापना केली असती. त्यामुळेच ३ एप्रिल १६८० रोजी मोरोपंत पिंगळे आणि अण्णाजी दत्तो यांनी राजांचा खून केला.

शिवाजीराजांना राज्याभिषेक करणे अत्यावश्यक होते. पण स्वत:ची धर्मसंहिता नसल्यामुळे राजांना ब्राह्मणांच्या म्हणजेच हिंदू धर्मावर अवलंबून रहावे लागले. शिवरायांना स्वत:चा धर्म असता तर ब्राह्मणांनी राज्याभिषेक प्रसंगी छळ केला नसता. राजांच्या कारभारात नाक खुपसले नसते. **शिवरायांची धार्मिक बाजू सांभाळणारे संत तुकाराम महाराज यांचा ब्राह्मणांनी शिवरायांच्या बालपणी खून केला. अन्यथा संत तुकारामांनी राज्याभिषेकापर्यंत स्वतंत्रधर्म स्थापणे केला असता.** आणि ब्राह्मणांनी म्हणजेच हिंदूधर्माने शिवरायांचा केलेला छळ, केलेला विरोध, शूद्र म्हणून केलेली अवहेलना याचा बदला घेतला असता ही गरज ओळखून देशातील अनेक अभ्यासकांनी, संशोधकांनी, विचारवंतांनी, देशभक्त समाज सुधारकांनी शिवरायांच्या विचार प्रेरणेचा **शिवधर्म** स्थापन केलेला आहे.

शिवधर्म हा शिवरायांचा धर्म आहे. शिव म्हणजे शिवाजी! शिव म्हणजे सत्य, मंगलमय आणि उदात्त! शिवधर्मात असत्य काहीही नाही. संत तुकाराम महाराज, शहाजीराजे, संभाजीराजे, ताराराणी यांच्या कर्तृत्वाचा व विचारांचा अमूल्य ठेवा म्हणजे शिवधर्म! स्वातंत्र्याची आद्यजनक राजमाता जिजाऊमाँसाहेब यांना प्रेरणा स्त्रोत मानून एकमेव आणि पहिलाचा धर्म आहे. ज्यांनी आपल्यासाठी संपुर्ण आयुष्य घालविले. तेच शिवधर्माचे देव आहेत. ब्राह्मणनिर्मित खोटे, काल्पनिक देव आणि ग्रंथ याला शिवधर्मात अजिबात स्थान नाही. शिवरायांना छळणाऱ्या ब्राह्मणांना शिवधर्मात अजिबात प्रवेश नाही.

आता वाचकांनी ठरवावे ही शिवरायांना शूद्र ठरविणारा, राज्याभिषेक नाकारणारा, अमाप पैसा घेऊन राज्याभिषेक प्रसंगी छळणारा हिंदूधर्म शिवरायांचा का शिवरायांच्या विचार प्रेरणेतून निर्माण झालेला शिवधर्म शिवरायांचा?

शिवाजीराजे धर्मनिष्ठहिंदू असते तर राजांनी राज्याभिषेक केला नसता, कारण ब्राह्मणेत्तरांना राज्याभिषेक करण्यास बंदी होती. राजे धर्मनिष्ठ हिंदू म्हणजेच ब्राह्मणनिष्ठ असते तर राजांनी समुद्र ओलांडला नसता, कृष्णा कुलकर्णीला ठार मारले नसते, शूद्रातिशूद्रांना अधिकार पदावर नेमले नसते, राजे धर्मनिष्ठ हिंदू असते तर सत्यनारायण, यज्ञ, अभिषेक केला असता. मुहूर्त पाहिला असता, रोज भट निर्मित ग्रंथांची पारायणे केली असती. या उलट राजांनी भटनिर्मित सर्व हिंदूग्रंथांना लाथ मारली. राजे धर्मनिष्ठ हिंदू असते तर त्यांनी रोज ब्राह्मणांचा सल्ला घेतला असता, याउलट राजांनी अनेक ब्राह्मण कापले व म्हणाले ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पहातो? यावरुन सिद्ध होते की शिवाजीराजे शिवधर्माचे आहेत.

## हिंदूधर्माच्या छळामुळे जिजाऊमाँसाहेबाचे दु:खद निधन

शिवाजीराजांना शूद्र म्हणून राज्याभिषेक नाकारला. धर्म-संस्कृतीच्या नावाखाली गागाभट्टाने विरोध केला. या अपमानामुळेच जिजाऊ माँसाहेबांसारखा स्वराज्याचा आधारवड १७ जून १६७४ रोजी कोसळला. राज्याभिषेक झाल्यानंतर लगेचच १० दिवसांनी जिजाऊंचे नैसर्गिक निधन होणे शक्य नाही. म्हणजे ब्राह्मणी व्यवस्थेने माँसाहेबांचा देखील बळी घेतला. पराक्रमी, विव्दान, प्रजावत्सल असणाऱ्या माँसाहेबांचा बळी घेणारा धर्म माँसाहेबांचा धर्म होऊच शकत नाही. यासाठीच मराठ्यांना शिवधर्माची गरज आहे.

## शिवरायांचा दुसरा राज्याभिषेक-शिवधर्माची पायाभरणी

शिवरायांचा ६ जून १६७४चा राज्याभिषेक म्हणजे या देशातील ब्राह्मणांनी पैसा मिळवून राजांचा व बहुजनांचा केलेला फार मोठा छळ होता. पण आपला धर्म नसल्यामुळे ब्राह्मणांच्या हिंदूधर्मावर शिवरायांना अवलंबून रहावे लागले. हे शल्य राजांना होतेच. म्हणूनच शिवरायांनी २४ सप्टेंबर १६७४ रोजी दुसरा राज्याभिषेक अवैदिक पद्धतीने केला. यासाठी निश्चलपुरी गोसावी यांनी पौरोहित्य केले. यासाठी अधिक प्रसिद्धी किंवा खर्च आला नाही. या राज्याभिषेकप्रसंगी एकही अपमानास्पद घटना घडली नाही.

शिवरायांनी केलेला दुसरा राज्याभिषेक म्हणजे त्यांनी ब्राह्मणीधर्म (हिंदूधर्म) नाकारल्याचे सिद्ध होते. हिंदूधर्मातील ग्रंथ ब्राह्मणांच्या हिताचे व बहुजनांच्या घाताचे आहेत हे राजांनी हेरले. हिंदुत्व म्हणजे ब्राह्मणत्व आहे हे राजांनी ओळखले. म्हणूनच राजांनी दुसरा राज्याभिषेक केला. शिवरायांच्या जीवनात दुसऱ्या राज्याभिषेकाला फार मोठे महत्व आहे. दुसरा राज्याभिषेक आपल्याला खरा धर्म सांगतो. म्हणून ब्राह्मण दुसरा राज्याभिषेक सांगत नाहीत. दुसरा राज्याभिषेक म्हणजे शिवधर्माची पायाभरणी आहे. दुसरा राज्याभिषेक २४ सप्टेंबर हा शिवधर्मदिन (बहुजनमुक्तीदिन) आहे.

## शिवरायांचे मुळ राजस्थान की महाराष्ट्र

शिवाजी महाराजांचे पुर्वज राजस्थान मधील सिसोदिया वंशातील होते. असा गैरसमज अनेक लोकांचा आहे. ज्यावेळेस राजांच्या राज्यभिषेकाला ब्राह्मणांनी शूद्र म्हणून विरोध केला. तेव्हा बाळाजी आवजी यांनी नकार देणाऱ्या गागाभट्टाला निमंत्रित करण्यासाठी चातुर्य वापरले व खोटी

वंशावळ दिली. तेव्हा गागाभट्ट पैशाच्या अभिलाषेने राज्याभिषेकासाठी आला. म्हणजे राज्याभिषेकाच्या पुर्ततेसाठी बाळाजी आवजी यांनी दिलेली विसंगत वंशावळ याला प्रमाणभूत मानून शिवरायांना सिसोदिया वंशातील ठरविले. हे अनैतिहासिक आहे.

शिवाजीराजांचे पूर्वज महाराष्ट्रातीलच मूल निवासी आहेत. त्यांचा उदेपूरच्या घराण्याशी कसलाही संबंध नाही. अशी वस्तुस्थिती असताना राजांना राजस्थानमधील ठरवायचे व महाराष्ट्रातच त्यांना उपरे ठरवायचे हे ब्राह्मणी षड्यंत्र आहे.

## शिवाजी-व्यंकोजी यांच्यामध्ये भांडणे लावणारा हनुमंते

रघुनाथपंत हनुमंते हा एक भ्रष्टाचारी व चहाडखोर अधिकारी तंजावरला व्यंकोजीराजांच्या पदरी होता. त्याने प्रशासनात केलेल्या गंभीर चुकांमुळे व्यंकोजीराजांनी त्याला बडतर्फ केले होते. तो तामिळनाडुतून थेट रायगडावर आला. आणि व्यंकोजी राजाबाबत अनेक चहाड्या सांगू लागला. पण राजे दूरदृष्टीचे आणि चाणाक्ष राजे होते. राजांनी हनुमंतेचा डाव ओळखला. हनुमंतेला वाटले व्यंकोजीराजे राजांचे सावत्र भाऊ आहेत. त्यामुळे राजे व्यंकोजीच्या विरोधात भूमिका घेतील. पण राजांनी या सर्व ब्राह्मणांचे सर्व कावे ओळखलेले होते. राजांनी दक्षिण मोहिम काढली. ती व्यंकोजीवर हल्ला करण्यासाठी नव्हे, तर दक्षिणात्य राजकर्त्यांची युती करावी आणि दिल्लीचे सिंहासन जिंकावे या विशाल दृष्टीकोनातून काढली होती. रघुनाथ हनुमंते यांनी राजांचे व्यंकोजीशी भांडण लावून पोळी भाजण्याचा प्रयत्न केला होता. पण राजांच्या दूरदृष्टीमुळे हनुमंतेला त्यात यश आले नाही.

## शिवरायांचा अवसानघात करणारा कुमंत्री मोरोपंत

मोरोपंत पिंगळे यांनी शिवरायांना खूप त्रास दिला. गागाभट्टाला फितवले व राज्याभिषेकासाठी अनेक अडचणी निर्माण केल्या. म्हणूनच मोरोपंतांचा उल्लेख अनेक ठिकाणी मयुरादी कुमंत्री करण्यात आलेला आहे. शिवरायांनी स्वराज्यात किल्ले बांधण्यास सुरुवात केली. तेव्हा मोरोपंत आणि निळोपंताने किल्ले बांधण्यास विरोध केला. राजे खूप पैसा खर्च करतात, असा अपप्रचार मोरोपंताने सुरु केला. हे जेव्हा राजांना समजले तेव्हा राजांनी मोरोपंतांची चांगलीच खरडपट्टी केली. राजे म्हणाले, मला माहित आहे तुम्ही किती शहाणे आहात ते? मी किल्ले का बांधतो? जसा शेतकरी शेतात माळा

बांधून शेतीचे रक्षण करतो. नावाडी जसे खिळे मारुन नाव मजबूत करतो. त्याप्रमाणे किल्ले बांधून भूमिपुत्रांचे स्वराज्य भक्कम करावयाचे आहे. आणि तुम्ही मला शहाणपणा शिकविता? असे राजे मोरोपंताला म्हणताच मोरोपंत तोंड झाकून घरात निघून गेला. कारण त्याचा अपमान आजपर्यंत कोणीही केला नव्हता. (*संदर्भ- वा.सी. बेंद्रे लिखित छत्रपती संभाजी महाराज- पृष्ठ-८४*)

शिवाजीराजांना राज्यभिषेकाच्या निमित्ताने ब्राह्मणांचा क्रूरपणा प्रकर्षाने जाणवला. कितीही प्रेमाने वागविले, जवळ केले, मदत केली तरी ब्राह्मण किती दगेखोर असतात. याचा प्रत्यक्ष अनुभव राजांना आला. तेव्हा राजे ब्राह्मणांना उद्देशून म्हणाले, '' **एवढी हरामखोरी तुम्ही कराल. ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करु पाहतो? जे गनिमांचे, गनिम ते तसाच नतिजा पावणार!**'' शिवरायांसारख्या विश्ववंद्य राजाने देखील शेवटी ब्राह्मणांना हरामखोर म्हटले व ब्राह्मण म्हणून तुमची गय केली जाणार नाही. असा इशारा दिला याचा अर्थ राजांना किती त्रास दिला असेल? राज्याभिषेकानंतर शिवाजीराजांचे नेतृत्व निर्विवाद झाले. सर्वांना समान न्याय, हक्क प्रस्थापित झाले. ब्राह्मणांचे वर्चस्व संपले.ग्रंथांचे राज्य संपले. कर्तबगार कुळवाडीभूषण शिवाजीराजांचे राज्य आले. त्यामुळे ब्राह्मणांचे पित्त खवळले. राजांना ठार मारण्याचे प्रयत्न ब्राह्मणांनी सुरु केले. म्हणून ब्राह्मणांनी राजांच्या घरात भांडणे लावण्यास सुरुवात केली.

## ब्राह्मणांनी संभाजीराजांची बदनामी सुरु केली

शिवाजीराजे दक्षिणेत गेल्यानंतर शिवाजीराजे आणि संभाजीराजे यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण करण्यासाठी ब्राह्मणांनी अनेक कटकारस्थाने रचली. या प्रसंगी संभाजीराजे शृंगारपुर येथे सासरवाडीला होते. शिवरायांच्या खूनानंतरच संभाजीराजे रायगडावर गेले. पण मोरोपंत, अण्णाजी दत्तो यांनी शिवाजीराजे आणि संभाजीराजे यांच्यामध्ये फुट पडावी, यासाठी संभाजीराजे रयतेला करात सवलत देतात, संभाजीराजे व्यसनी आहेत, ते व्यभिचारी आहेत अशा अफवा उठवायला सुरुवात केली. संभाजीराजांची बदनामी करण्यासाठी उमाजी पंडित प्रचारकासारखा संपुर्ण महाराष्ट्रात फिरला. शिवरायांच्या कानावर हा वृतांत अशी व्यवस्था राजांच्या ब्राह्मण मंत्र्यांनी केली. संभाजी-शिवाजी यांचा बेबनाव झाला की, या संघर्षाचा फायदा घ्यावा हा ब्राह्मणांचा डाव होता. **ब्राह्मण थेट कधीच लढत नाहीत ने नेहमी बहुजनात जीवघेणी भांडणे लावतात.** तसा प्रयत्न त्यांनी राजांच्या घरातच सुरु केला पण राजांनी ब्राह्मणांचा डाव ओळखला होता. कारण राजांचा संभाजीराजांच्या चांगुलपणावर विश्वास होता.

संभाजीराजांनी संपुर्ण आयुष्यात मद्याला स्पर्श केला नाही. त्यांना सुपारीचे सुद्धा व्यसन नव्हते. त्यांनी बुद्धभुषण, सातसतक, नायिकाभेद, नखशिख हे चार ग्रंथ लिहिले. ते कर्तव्यदक्ष होते म्हणूनच ते लोकप्रिय होते. त्यांनी एकाही ब्राह्मणाला कधीही मुजरा केला नाही. म्हणूनच ब्राह्मण त्यांच्यावर चिडलेले होते. ते संस्कृत शिकले, त्यांनी ग्रंथ लिहिले हा प्रस्थापित ब्राह्मणांवर त्या काळात मोठा हल्ला होता. म्हणूनच ब्राह्मणांनी संभाजीराजांसारख्या धवल चरित्राच्या राजपुत्राची बदनामी करण्यास सुरुवात केली. सोयराबाईला हाताशी धरण्याचा प्रयत्न केला. राजारामला गादीवर बसविण्याचे आमिष सोयराबाईला दाखविले. तिचे सावत्र मातृत्व जागे केले. पण सोयराबाईचे संभाजीराजांवर राजारामाप्रमाणेच प्रेम होते. सईबाईच्या अकाली निधनानंतर सोयराबाईंनी संभाजीराजांना जीवापाड जपले. जिजाऊमाँसाहेबांच्या कुशल मार्गदर्शनामुळे संपुर्ण कुटुंब स्वराज्यप्राप्तीसाठी ध्येयवेडे झाले होते. ध्येयवादी कुटुंबात क्षणभंगुर सुखासाठी कधीही ग्रंहकलह नसतो. त्यामुळे सोयराबाई या निष्कलंक व स्वराज्यनिष्ठ होत्या. म्हणूनच त्या शेवटपर्यंत ब्राह्मणांच्या सत्तांतराच्या कटात सहभागी झाल्या नाहीत. त्या कटात सहभागी झाल्या असत्या तर सोयराबाईंचे सख्खे भाऊ हंबीरराव यांनी मोहिते यांनी सोयराबाईची बाजू घेतली असती. पण हंबीरराव मोहिते मरेपर्यंत संभाजीराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. सोयराबाईंचे संभाजीवर सुपूत्रांप्रमाणेच नितांत प्रेम होते. तर संभाजीराजांनी देखील राजारामला सख्या भावाप्रमाणे व सोयराबाईला आईप्रमाणे सांभाळले होते. राजारामाचे तीन विवाह संभाजीराजांनी करुन दिले. **संभाजीराजे सोयराबाईंना स्फटिकासारख्या निर्मळ मनाची माता असे म्हणत.** याचा अर्थ संभाजीराजे आणि सोयराबाई यांचा कसलाही अंगर्तत कलह नव्हता. याउलट सोयराबाई, राजाराम, शिवाजीराजे यांना त्रास देणाऱ्या ब्राह्मणांनाच राजांनी ठार मारले. राजे निष्कलंक आणि स्वराज्यनिष्ठ असतानादेखील राजांची सातत्याने बदनामी का करण्यात आली? कारण राजे व्यवस्थेच्या बंधनात राहणारे नव्हते. ते स्वतंत्र विचारसरणीचे होते. परंपरेने गुलामगिरी सारखे सिंहासनावर आरुढ होण्याची स्वार्थी वृत्ती राजांची नव्हती. त्यामुळे संभाजीराजांची उमेद नष्ट करण्यासाठी त्यांची बदनामी करुन त्यांचा मानसिक छळ करण्यात आला. ते चारित्र्यसंपन्न आणि स्वराज्यनिष्ट होते याबाबत दुमत नाही. तरीदेखील संभाजीराजांची मोरोपंत, अण्णाजी दत्तो, प्रल्हादपंत, उमाजी पंडित इ. ब्राह्मणांनी बदनामी का केली? कारण संभाजीराजांनी ब्राह्मणी व्यवस्थेला जबरदस्त हादरा दिला होता. त्यांनी संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळविले होते, ४ ग्रंथ लिहिले होते. म्हणजे संभाजीराजांनी साहित्य क्षेत्रातील मक्तेदारीवर प्रहार केला. ब्राह्मण मंत्र्यांचे संभाजीराजांनी कधीही वर्चस्व स्विकारले नव्हते. गोर-गरीब बहुजन जनतेला अनेक सवलती दिल्या. त्यांनी. ब्राह्मणांची अरेरावी नष्ट केली. त्यामुळेच शिवाजीराजांच्या आश्रयाला असणाऱ्या सर्व ब्राह्मणांनी संभाजीराजांची बदनामीला सुरुवात केली.

कर्तृत्वसंपन्न धाडसी, पराक्रमी, विव्दान बहुजनांना संपविण्यासाठी त्यांनी सर्व बाजूंनी बदनामी करणे हे ब्राह्मणांचे विषारी हत्यार आहे. एखाद्या निष्कलंक विव्दान बहुजनांची बदनामी सुरु केली तर तो वैफल्यग्रस्त होते. चिंताग्रस्त होतो. आपण चांगले असताना आपली बदनामी कशी? या विचाराने कर्ता पुरुष वैफल्यग्रस्त होतो व त्याची हळूहळू उमेद संपते. राजांना नाउमेद करण्यासाठीच सर्व मंत्र्यांनी त्यांची बदनामी सुरु केली होती. संभाजीराजांनी सोयराबाईला आदराने वागविले. तरीदेखील अशी अफवा उठविली की, रायगडावर संभाजी आल्यावर त्यांनी सोयराबाईला चिणून मारले. पण सोयराबाई त्यावेळेस जिवंत होत्या. त्यानंतर सव्वा वर्षाने म्हणजे २७ ऑक्टो.१६८१ला सोयराबाईंचे निधन रायगडावर झाले. त्यावेळी राजे पन्हाळ्यावर होते. संभाजीराजांची ज्या स्त्रियांशी नावे जोडली जातात. त्या गोदावरी, कमळा, या स्त्रिया तर इतिहासात झाल्याच नाहीत. बखर, नाटक व कादंबरीकारांनी या स्त्रियांना जन्म दिला. राजांची अशाप्रकारे बदनामी करणारे हे शत्रू मोगलांपेक्षा क्रूर आहेत.

### हैद्राबादच्या बादशहाचे अधिकारी मादण्णा-आकण्णा

मादण्णा आणि आकण्णा हे ब्राह्मण हैद्राबादच्या पदरी अधिकारी होते. हिंदूत्ववादी ब्राह्मण मुस्लिम सत्ताधिशाचे अधिकारी कसे? पैसा-सत्ता हाच ब्राह्मणांचा खरा धर्म आहे. त्यासाठी ते नेहमी प्रबळ धर्मसत्तेत असतात. ब्राह्मण परकीय असल्यामुळे त्यांना देश आधि धर्म याबाबत कसलेही सोयर-सुतक नाही. आज भारतात बहुजन समाज अधिक आहे. त्यांचे नेतृत्व करण्यासाठी ते हिंदूत्वाचा जयजयकार करतात. समजा भारतात मुस्लिम जास्त असते तर सगळ्या ब्राह्मणांनी मुस्लिमांचा जयजयकार केला असता हा त्यांचा इतिहास आहे. अकबर, औरंगजेब, इंग्रजांच्या काळात ब्राह्मण त्यांचेकडे होते.

### शिवाजीराजांचा मृत्यू की खून?

अपयश आले तरी मोरोपंत, अण्णाजी, राहूजी सोमनाथ थांबले नाहीत. नानाप्रकारे शिवरायांना संपवायचेच हा पक्का निश्चय त्यांनी केला होता. त्या दरम्यान संभाजीराजे मोगलांकडून येवून पन्हाळा येथे थांबले होते. हंबीरराव मोहितेही रायगडावर नव्हते. मोरोपंतांना त्र्यंबकेश्वरला पाठविले होते. अण्णाजी दत्तो रायगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या पाचाडात थांबला होता. तर गडावर राहूजी सोमनाथ हा ब्राह्मण अधिकारी होता. तोही या हटात सहभागी होता. राजांना कसल्याही परिस्थितीत ठार मारायचे हा कट मोरोपंत, अण्णाजी दत्तो, राहूजी सोमनाथ यांनी केला. रायगडाची संपूर्ण नाकेबंदी करण्यात आली. कसल्याही प्रकारचा सुगावा लागणार नाही, याची दक्षता या तिघांनी घेतली. म्हणून या कटाचा संशय येऊ नये यासाठी मोरोपंत आणि अण्णाजी दत्तो घटनास्थळापासून दूर थांबले होते. खून करणारा

पाठीमागे कोणताही पुरावा राहणार नाही याची खबरदारी घेत असतो. या प्रसंगी राज्यातील अत्यंत महत्वाची माणसे रायगडावर नव्हती. संभाजीराजे पन्हाळगडावर होते. संभाजीराजांना शिवाजीराजांनी पन्हाळगडाच्या सुभेदारपदी नेमले होते. सेनापती हंबीरराव मोहिते तळबीड या ठिकाणी होते. तळबीड हे पन्हाळगडापासून जवळ तर रायगडापासून २५० किलोमीटर आहे. शिवाजीराजांच्या कुटुंबातील सर्व नातेवाईक पाचाडात होती. रायगडावर राहूजी सोमनाथ होता. तो क्रूर, स्वार्थी, पाताळयंत्री होता. असा स्पष्ट उल्लेख शिवभारतात आहे. (*संदर्भ- वा.सी. बेंद्रे लिखित- श्री. छ. संभाजी महाराज*) या प्रसंगी सोयराबाईवर प्रचंड दबाव होता. पण त्या असहाय्य असल्यामुळे कसलाही प्रतिकार करू शकल्या नाहीत. त्या वेळेस राजाराम फक्त दहा वर्षाचे होते.

३ एप्रिलचा दिवस उजाडला. राजांच्या भोवती ब्राह्मणांचे वलय होते. राहूजी सोमनाथने गडावरचे सर्व दरवाजे बंद केले. गडावरची कोणतीही बातमी फुटू नये याची दक्षता राहूजी सोमनाथने घेतली होती. कदाचित शिवाजीराजांना या कटाचा सुगावा लागल्यामुळे शिवाजीराजांनी आप्तस्वकियांना बोलावून घेण्यासाठी पत्र पाठविली. परंतू ती पत्र कोणालाही मिळाली नाहीत. कारण गडाची सर्व सुत्रे सोमनाथच्या ताब्यात होती. त्यामुळेच गडावर ब्राह्मण मंत्र्यांनी शिवाजीराजांचा खून करण्याचा कट रचला. याप्रसंगी शिवाजीरायांचे जेष्ठ पुत्र संभाजीराजांना ही बातमी समजणार नाही, याची जबाबदारी घेण्यात आली. सरसेनापती आणि शिवरायांचे मेहुणे हंबीरराव मोहिते हे देखील अंत्यविधीला उपस्थित नव्हते. जवळ कोणीही नातेवाईक नव्हते नातेवाईक नव्हते म्हणूनच सोयराबाईंनी प्रतिकार केला नसावा. आणि हा खून सोयराबाईंनी केला अशी अफवा ब्राह्मणांनी उठविली. सत्ता प्राप्तीसाठी हे कृत्य सोयराबाईंनी केले असावे अने अनेकांना वाटले. कारण राजारामाला लगेचच सर्व ब्राह्मण मंत्र्यांनी सिंहासनावर बसविले. पण सोयराबाईंनी राजारामाला गादीवर बसविण्याचा आग्रह केला नव्हता. राजाराम दहा वर्षाचे असल्यामुळे आपल्या तंत्राने राज्यकारभार करावा असे नियोजन ब्राह्मण मंत्र्यांचे होते. शिवाजीराजांच्या खूनानंतर संभाजीराजांचा खून करायचा व नंतर लहान राजारामचा खून करायचा व सर्व सत्ता ताब्यात घ्यायची असा कुटील डाव ब्राह्मण मंत्र्यांचा होता. म्हणूनच ते संभाजीराजांना अटक करण्यासाठी गेले होते. पण हंबीरराव मोहिते यांच्या दूरदृष्टीमुळे हा अनर्थ टळला. हंबीरराव मोहिते हे राजारामाचे सख्खे मामा होते. त्यामुळे ते आपणाला पूर्ण सहकार्य करतील अशी आशा ब्राह्मणांना होती. पण हंबीररावांच्या स्वराज्यनिष्ठेमुळे दगाबाज ब्राह्मण मंत्र्यांनाच अटक झाली.

ज्यावेळेस महाराजांचा मृत्यू झाला, तेव्हा राजांचे वय फक्त ५० वर्षांचे होते. राजांना कोणताही असाध्य रोग नव्हता किंवा ते प्रदीर्घ आजारी नव्हते. राजांची प्रकृत्ती निरोगी होती. असा स्पष्ट उल्लेख

'कॉस्मा दी गार्डा' हा परकीय इतिहासकार करतो. वयाच्या ५०व्या वर्षी राजांना नैसर्गिक मृत्यू येणे कदापिही शक्य नाही.

राजांचे समाजपरिवर्तनाचे कार्य, रायगडावरील ब्राह्मण मंत्र्यांचा अंतर्गत विरोध, ३ एप्रिलचे गडावरील संशयास्पद वातावरण, महाराजांनी पाठविलेले पण न मिळालेले पत्र, राजांचा घाई-घाईने उरकून घेतलेला अंत्यविधी, ही बातमी कोणालाही समजणार नाही याची अण्णाजी दत्तो, राहूजी सोमनाथ, मोरोपंत यांनी घेतलेली दक्षता. पराक्रमी, विव्दान, चारित्र्यसंपन्न आणि जेष्ठ पुत्र संभाजीराजांऐवजी १० वर्षाच्या कनिष्ठ पुत्र राजारामाला गादीवर बसविण्यामागची ब्राह्मण मंत्र्यांची भूमिका आणि संभाजीराजांचे सांत्वन करण्याऐवजी त्यांना अटक करण्यास गेलेले अण्णाजी दत्तो, मोरोपंत या सर्वच बाबींमुळे शिवाजीराजांचा ब्राह्मण मंत्र्यांनी खून केला हे सिद्ध होते.

संभाजीराजांना अटक (ठार) करण्यास निघालेल्या मोरोपंत, अण्णाजी, प्रल्हादपंत या मंत्र्यांना वाटेतच हंबीरराव मोहित्यांनी अटक केली. संभाजीराजे रायगडावर गेले. त्यांनी सर्व मातांचे सांत्वन केले. याप्रसंगी सोयराबाईंने शिवरायांना विष दिले अशी अफवा होती. याची जाणीव कदाचित सोयराबाईंना सुरुवातीला नसावी, परंतु सोयराबाई निर्दोष होत्या हे सिद्ध करणारा एक भक्कम पुरावा आहे. **संभाजीराजे २४ ऑगस्ट १६८० रोजी म्हणतात की, ''सोयराबाई स्फटिकासारखी निर्मळ मनाची आहे''**. याचा अर्थ सोयराबाई निर्दोष तर होत्याच, पण संभाजीराजांना सोयराबाई आदरस्थानी होत्या. कुमंत्र्यांनीच सोयराबाईला संभाजीराजांविरुद्ध भडकाविण्याचा प्रयत्न केला होता. (*संदर्भ-छ. संभाजी-२२१ वा.सी.बेंद्रे*) सोयराबाई-संभाजी मातापुत्रांचे संबंध खुप प्रेमळ होते. संभाजीराजांनी धाकट्या राजाराम या भावाला जिवापाड जपले. संभाजीराजांनीच राजारामाची नंतर तीन लग्ने करून दिली. (*ताराबाई-मोहिते, राजसबाई-गाडगे, आंबिकाबाई-खानविलकर*) याचा अर्थ संभाजी आणि सोयराबाई यांच्यामध्ये सत्तेसाठी कसलाही संघर्ष नव्हता. त्यांना सत्ताभिलाषा नव्हती. त्यामुळे सोयराबाईंनी शिवाजीराजांना विष दिलेले नाही. सोयराबाई खून कटात अजिबात नाहीत. याचा सरळ अर्थ राजांचा खून प्रल्हाद निराजी, मोरोपंत, अण्णाजी दत्तो या ब्राह्मण मंत्र्यांनी केला आहे, हे निर्विवाद सत्य आहे. हे सर्व मंत्री खून कटाचे सुत्रधार आहेत. प्रत्यक्ष खुनाची अंमलबजावणी मात्र राहूजी सोमनाथ यांनी केली.

आता आपण शिवाजीराजांच्या मृत्यूबद्दल देशी आणि परदेशी साधनांचा वापर करू. पुढील संदर्भ साधनांची चिकित्सा करण्यापुर्वी त्या साधनांचा काळ व कर्ता याचाही विचार करणे अत्यंत महत्वाचे आहे. मराठी आणि संस्कृत साधनांचे लेखक हे ब्राह्मण असल्यामुळे बऱ्याच सत्य शोधण्यास अडचणी येतात. तरीदेखील अपराधीपणाची जाणीव संदर्भ साधनात प्रकर्षाने जाणवल्यामुळे राजांच्या

खूनाचे महाकोडे सुटण्यास मोठी मदत झाली आहे. सुरुवातीला आपण अमराठी संदर्भ साधनांचा विचार करु.

- इंग्रजांचे पत्र- ''शिवाजीमहाराजांचा मृत्यू रक्तातिसाराने झाला''.
- पारशी कागदपत्र (मासिरे आलमगिरी-साकीमुस्तेदखान)- '' शिवाजी हे घोड्यावरुन उतरले त्यांना अतिउष्मेमुळे दोन वेळा रक्ताच्या उलट्या झाल्या. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.''
- भिमसेन सक्सेना (औरंगजेबाचा अधिकारी)- ''शिवाजीराजे आजारी पडले काही दिवसाच्या आजारानंतर ते मृत्यू पावले.''
- खाफिखान (मोगलसाम्राज्याचा इतिहास)- ''शिवाजीराजांनी जालन्यावर स्वारी केली याचवर्षी ते आजारी पडून ते मृत्यू पावले.''
- निकोलाओ मनुची (असे होते मोगल)- '' शिवाजीराजे नेहमी मोहिमेवर फिरत, या दगदगीने थकून आणि रक्ताच्या उलट्या होऊन त्यांना मरण आले''.
- दाघ रजिस्टर (डच कागदपत्र)- ''शिवाजीराजांच्या दुसऱ्या बायकोने राजांवर विष प्रयोग केला असवा''. (दाघ रजिस्टर- १६८०. पृष्ठ ७२४.२९, संदर्भ-परकियांच्या दृष्टी.)

वरील सर्व संदर्भ साधने बातम्या किंवा अफवा ऐकूनच राजांच्या मृत्यूबद्दल लिहितात. वरील साधनांच्या लेखकांपैकी कोणीही रायगडावर किंवा आसपास नव्हता. त्यामुळे वरील साधनांच्या लेखकांची साधने संदिग्ध, अविश्वसनीय आहेत. शिवाजीराजांनी राजारामाचा विवाह १५ मार्च १६८० रोजी प्रतापराव गुजर यांची कन्या जानकीबाईशी लावून दिला. त्यानंतर अठरा दिवसांनीच शिवाजीराजांचा खून झाला. १८ दिवसात राजे आजारी पडणे आणि आजार विकोपाला जाणे कदापिही शक्य नाही. वरील साधनांपैकी आलमगिरीकार मुस्तेदखान, मनुची आणि इंग्रज हे राजांना रक्ताच्या उलट्या झाल्या त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला, ते सांगतात. पण रक्ताच्या उलट्या का झाल्या? हे त्यांना माहीत नाही. विष दिल्यानेच उलट्या झाल्या. भिमसेन सक्सेना आणि खाफीखान हे राजे आजारी पडून मेले सांगतात. पण आजारी का पडले? हे त्यांना माहित नाही. आजारी का होते? हे देखील त्यांना खात्रीलायक माहिती

नाही. दाघ रजिस्टरमध्ये मात्र विष प्रयोगाचा उल्लेख आहे. परंतु त्यांनीही अफवेवर विश्वास ठेवलेला असल्यामुळे ब्राह्मण मंत्र्यांनीच राजांना विष प्रयोगाने ठार मारले त्याऐवजी राजांच्या पत्नीचा उल्लेख केलेला आहे. सोयराबाईंची अफवा होती. पण ब्राह्मण मंत्र्यांनीच राजांना विष प्रयोगाने ठार मारले. हे दाघ रजिस्टर निसंदिग्धपणे सिद्ध करते.

आता आपण मराठी-संस्कृत संदर्भ साधनांचा अभ्यास करु-

या साधनामध्ये समकालीन, उत्तरकालीन साधने असे प्रकार आहेत. सुरुवातीला आपण उत्तरकालीन साधनांची चिकित्सा करु.

- ९१ कलमी बखर- ''राजांना नवज्वराची व्यथा झाली आणि राजे स्वामीस कैलासवास झाला''.
- शिवदिग्विजय- ''सोयराबाईकडून राजांना विषप्रयोग झाला''.
- चिटणीस बखर- ''सोयराबाईवरच आरोप ठेवते''.
- शिवभारत- (*अपुर्ण काव्य)*
- जेधे शकावली- चैत्र शुद्ध पौर्णिमा शनिवारी (*३ एप्रिल१६८०*) दिवसा दोन प्रहरी रायगडावर शिवाजीराजांचे निधन झाले. हंबीरराव मोहिते यांनी मोरोपंत पेशवे अण्णाजीपंत आणि प्रल्हादपंतांना कैद करुन पन्हाळगडावर संभाजीराजांकडे नेले.
- शिवापुर शकावली- चैत्र पौर्णिमेस शिवाजी राजे समाप्त झाले.
- चिटणीस बखर व शिवदिग्विजय १८१८ सालची असल्यामुळे समकालीन नाही. पण सोयराबाईंनी विषप्रयोग केला हा उल्लेख आहे. याचा अर्थ राहूजी सोमनाथाने विषप्रयोग केला होता. ब्राह्मण मंत्र्यांनी राजांचा विषप्रयोगाने खून केला. पण सर्वत्र सोयराबाईने खून केला अशी अफवा पसरवली. म्हणूनच सोयराबाईने विषप्रयोग केला असे देशी व परदेशी लेखकांनी लिहिले. त्यांच्यापर्यंत अफवा पसरली होती. खरी घटना पोहोचली नव्हती.

- शिवभारतकार कविंद्र परमानंदचे अकाली निधन झाल्यामुळे कारतलबखानाचे उमरखिंडीतील युद्ध येथपर्यंतचाच उल्लेख आहे.

- जेधे शकावली - ही शकावली म्हणजे दैनंदिनी असल्यामुळे स्पष्टीकरण नाही. त्यामुळे फक्त निधन झाले एवढाच उल्लेख जेधेशकावलीत आहे. पण त्यानंतर लगेच हंबिरराव मोहिते यांनी मोरोपंत, अण्णाजी व प्रल्हाद यांना कैद केल्याचा उल्लेख आहे. त्यांनी खून केला म्हणूनच त्यांना अटक केली असा स्पष्ट अर्थ निघतो. म्हणजेच जेधे शकावलीसुद्धा मोरोपंत, अण्णाजी, प्रल्हाद व राहूजी सोमनाथ यांनी खून केला असे सिद्ध करते.

- आता शेवटचे व अत्यंत महत्वाचे साधन म्हणजे सभासद बखर.

या बखरीचा कर्ता कृष्णाजी अनंत सभासद यांनी राजांच्या कारभारात स्वत: भाग घेतला होता. त्यामुळे त्या बखरीतील अतिरंजित व श्रद्धाळू भाग वजा केला तर बरीचशी वस्तुनिष्ठता आहे. सभासद मृत्यूबद्दल पुढीलप्रमाणे वर्णन करतात.

‘मग काही दिवसांनी राजास व्यथा ज्वराची झाली. राजा पुण्यश्लोक काल-ज्ञान जाणे. विचार पाहता आयुष्याची मर्यादा झाली हे कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते. त्यामध्ये **सभ्य** लोक बोलावून आणले बोलिले की तुम्ही चुकूर होऊ नका. हा तो मृत्यूलोकच आहे. यामागे कित्ती उत्पन्न झाले कित्ती गेले आता तुम्ही निर्मळ सुखरुप बुद्धीने असणे. आता अवघे बाहेर पैसा. आपण श्रींचे स्मरण करितो म्हणोन अवघियांस बाहेर बैसवले. आणि राजियांनी श्री भागिरथीचे उदक आणून स्नान केले. भस्म धारण करुन रुद्राक्ष धारण केले. आणि योगाभ्यास करुन आत्मा ब्रह्मांडांस नेऊन दशव्दारे फोडून प्राणप्रयाण केले. शालिवाहन शके १६०२ रौद्रमान संवत्सरे चैत्र शुद्ध पौर्णिमा, शनिवार दोन प्रहरी काळ रायगडी झाला. त्यानंतर शिवदूत विमान घेऊन आले. आणि राजे विमानी बसून कैलासास गेले. हे जड शरीर मृत्यूलोकी त्याग केला. राजाचे देहावसन त्या दिवशी पृथ्वीकंप झहाला. गगनी धुमकेतू उदेला उल्कापात आकाशाहून आला. रात्री जोड इंद्रधनुष्य निघाली. अष्टदिशा दिगदाह होऊन गेला. श्रीशंभू महादेवी तळ्याचे उदक रक्तांबर आले. पाण्यातील मच्छ बाहेर पडून अमासवाणी उदक झाले. ऐसी अरिष्टे झाली. मग राजेयांचे कलेवर चंदनकाष्टेवर व बेलकाष्टे आणून दग्ध केले. स्त्रिया राज्यपालख्या कारकून हूजरी सर्व लोकांनी सांगितले की, धाकटा पुत्र राजाराम क्रिया करावी. सर्वांनी खेद केला राजाराम यांनी अत्यंत शोक केला. त्यानंतर उत्तरकार्य कनिष्ठांनी करावे असे सिद्ध केले. वडिल पुत्र

संभाजीराजे वेळेस नाहीत. याजकरिता धाकट्याने क्रिया केली असे राजांचे चरित्र आख्यान उत्पन्न काळापासून देहावसानापर्यंत जाहले.'

जिंजी येथे राजारामासोबत असताना सभासदांनी बखर लिहिली. सभासद हे राजारामांच्या पदरी आल्यामुळे सोयराबाईवर जो आळ आलेला होता त्याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. तसेच सभासद हे स्वत: ब्राह्मण असल्यामुळे त्यांनी सत्यकथन करण्याचे टाळलेले आहे. सभासद हे देवभोळे असल्यामुळे प्रस्तुत चरित्रात अनेक ठिकाणी अतिरंजित आणि चमत्कारिक वर्णन सभासदांनी केलेले आहे. **अपराधीपणाची भावना प्रखर झाली की, अतिरंजित स्पष्टीकरण केले जाते.** उदा. संत तुकारामांचा खून ब्राह्मणांनी केला हे लपविण्यासाठी ब्राह्मणांनी तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले असे लिहून ठेवले. अगदी तसाच प्रकार राजांच्याबाबत घडलेला आहे. सभासदांनी केलेल्या वर्णनाचे आपण आता स्पष्टीकरण करू.

शिवाजीराजांना ज्वर झाला, असे सभासद सांगतात. ज्वर झाला असताना राजांनी योगाभ्यास केला, हे कदापि शक्य नाही. राजांनी आयुष्यात कधीही योगसाधना केलेली नाही. मग ३ एप्रिल १६८० या दिवशीच राजांनी आत्मा ब्रह्मांडास लावणे व दशव्दारे फोडून प्राणत्याग करणे असे धादांत खोटे लिहिणे. म्हणजेच राजांचा खून झाला हे सिद्ध होते. योग साधनेने शारिरीक व मानसिक संतुलन राहते. याबाबत दुमत नाही, पण योगसाधनेने मृत्यू, अमरत्व, सिद्धी मिळते या भाकड कथा आहेत. शिवाजीराजे काही गाभाऱ्यात बसून किंवा अरण्यात बसून योगसाधना करणारे भोंदू महाराज नव्हते. कुटुंब स्वराज्य, समाज वाऱ्यावर सोडून आत्मा ब्रह्मांडाला लावण्याचे देशद्रोही उद्योग महाराजांनी केले नाहीत. हातात तलवार घेऊन स्वराज्य निर्मिती या नियोजनासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा सदुपयोग केला आणि सर्वात महत्वाचे म्हणजे योग साधना म्हणजे फक्त एका दिवसात साध्य होणारी साधना नव्हे. सभासद म्हणतात की, राजांनी सर्व **सभ्य** जनांना बाहेर बसण्यास सांगितले. याचा अर्थ खून झाला. त्याप्रसंगी राजांजवळ एकही **सभ्य** किंवा जवळचा नातेवाईक नव्हता. महाराणी सोयराबाई राणीमहालातच होत्या. शिवाजीराजांचे घर म्हणजे १०×१० ची खोली नव्हे. शिपाई, अधिकारी, मंत्री, सरदार आणि महाराणी यांच्यासाठी स्वतंत्र कार्यालये आणि निवासस्थानाचीही व्यवस्था रायगडावर आहे. (*जिज्ञासूंनी रायगड अवश्य पहावा*) सोयराबाई स्फटिकाप्रमाणे स्वच्छ मनाच्या आहेत. असा अभिप्राय संभाजीराजांनी शिवाजीमहाराजांच्या खूनानंतर ५ महिन्यांनी दिलेला आहे. याचा अर्थ सोयराबाई निर्दोष म्हणजेच **सभ्य** आहेत आणि सभासद म्हणतात त्याप्रमाणे सोयराबाई (*खून झाला त्याप्रसंगी*) सभ्य असल्यामुळे राजांजवळ नव्हत्या. इतर सर्व नातेवाईक खाली पाचाडात होते. या संधीचा फायदा घेऊनच अण्णाजी दत्तो, मोरोपंत यांनी राहूजी सोमनाथ मार्फत राजांना विष देऊन खून केला. खूनाबाबत संशय येऊ नये यासाठी वेगवेगळ्या अफवा उठविल्या.

शिवाजीराजे विमानात बसून कैलासास गेले असे सभासद म्हणतात, आणि लगेचच पुढील परिच्छेदात राजांच्या प्रेताचे दहन राजारामाने केले असे लिहितात. विमानात बसून कैलासास गेल्यानंतर पुन्हा अंत्यविधी करण्याची गरजच काय? म्हणूनच ब्राह्मणांनी बहुजन समाजाला कसलाही संशय येऊ नये यासाठी फार पुर्वी जडदेह, सुक्ष्मदेह, आत्मा, परमात्मा, स्वर्ग, नरक या कल्पना निर्माण केल्या. राजे विमानात बसून गेले असे सभासदाशिवाय कोणीही सांगत नाही, याचा अर्थ तुकाराम महाराजाप्रमाणेच राजांचा खून करुन विमानाची कथा त्यांच्या चरित्रात घुसडण्यात आली. परिवर्तनाचे काम करणाऱ्या बहुजन समाजातील महापुरुषांना अशाप्रकारे संपविण्यात आलेले आहे. अशा प्रकारे राहूजी सोमनाथने राजांचा खून केला. राजांचा खून झाला नसता तर जगात राजांनी स्वातंत्र्य, समता, बंधूभाव प्रस्थापित केली असती. अशा विश्ववंद्य राजांचा खून करुन ब्राह्मणांनी केवळ शिवाजीराजांचेच नव्हे तर संपूर्ण जगाचे नुकसान केलेले आहे.

शिवरायांच्या खूनामुळे रायगडावर पूर्णत: तणावाचे आणि भितीचे वातावरण होते. ही बातमी फुटणार नाही याची पुर्ण दक्षता ब्राह्मणांनी घेतली होती. राजांचा खून झाल्याची बातमी समजली असती तर देशात एकही ब्राह्मण त्याही काळात बहुजन समाजाने जिवंत ठेवला नसता, पण त्यांनी जनतेची दिशाभूल केली. राजांचा मृत्यू गुडघी रोगामुळे झाला, अशी अफवा पसरवली. हीच बातमी सर्वदूर पोहचली. पण मित्रहो, जगाच्या इतिहासात पुर्वी आणि आजदेखील गुडघीरोग कोणालाही झाल्याचे उदाहरण सापडलेले नाही. म्हणजेच ब्राह्मण डावपेच बदलतात, उद्देश बदलत नाहीत. राजांचा खून सोयराबाईंनी केला असाही प्रचार ब्राह्मणांनी सुरु केला. राजांचा मृत्यु अँथ्रॅक्सने झाला असाही अपप्रचार आजदेखील निनाद बेडेकरसारखे राजांचे शत्रू करतात (*इंडियन एक्सप्रेस नोव्हें. २००१*) म्हणजेच राजांचा खून करणारे खरे आरोपी निर्दोष सुटावेत यासाठी ब्राह्मणांनी अनेक अफवा पसरविल्या व आजदेखील पसरवत आहेत.जनतेला खरे गुन्हेगार समजू नयेत, यासाठी लक्ष वेधून जनतेची दिशाभूल करणे व आपण कसे निरपराध आहोत याचा आव आणण्यासाठी ब्राह्मणी प्रचार आजदेखील वेगवेगळ्या वावड्या उडवत आहेत. राजांचा खून केल्याबरोबरच राजारामाला ब्राह्मणांनी सिंहासनावर बसविले, कारण राजाराम लहान होत, राजारामाला नामधारी राजा करायचे आणि राज्यकारभाराची सर्व सुत्रे हाती घ्यावयाची आणि लवकरच राजारामचाही काटा काढायचा असा डाव या मंत्र्यांचा होता. तर संभाजी हुशार, चाणाक्ष, पराक्रमी, धाडसी होते. म्हणून संभाजीराजांना मोरोपंत, अण्णाजी दत्तो अटक करण्यास पन्हाळगडाकडे निघाले. वाटेतच हंबीरराव मोहिते यांनी त्यांना अटक केली, आणि संभाजीराजांचा रायगडावर अभिषेक केला. संभाजीराजे गादीवर येताच संभाजीराजांना ठार मारण्याचा ब्राह्मणांनी चार वेळा प्रयत्न केला, पण तीन वेळा संभाजीराजांनी त्यांना माफ केले होते. चौथ्या वेळेस संभाजीराजांनी सर्व ब्राह्मण मंत्र्यांना ठार मारले, आणि शिवरायांच्या खूनाचा बदला घेतला.

## महाराणी पुतळाबाई सती की खून?

शिवरायांचा खून केल्यानंतर राजांचा अंत्यविधी घाई-घाईने उरकण्यात आला. राजांच्या खूनानंतर एकही पत्नी सती गेली नाही. कारण राजांनी सतीप्रथा बंद केली होती. पण पुढे पुतळाबाई सती का गेल्या? त्यानंतर ब्राह्मणांचे प्रस्थ वाढले, आणि त्यांनी राजांच्या समाजसुधारणेला कलंक लावण्यासाठी पुतळाबाईंनी सती जावे यासाठी देव-धर्म यांच्या गोंडस नावाखाली ब्राह्मणांनी पुतळाबाईचा छळ केला. म्हणूनच पुतळाबाई राजांच्या अंत्यविधीनंतर ८५ दिवसांनी सती गेल्या. म्हणजेच राजांनी केलेल्या क्रांतीला त्यांच्या घरातच काळीमा फासण्याचा ब्राह्मणांनी प्रयोग केला.

भारतातील सती प्रथेला प्रखर विरोध करणारे शिवाजीराजे हे पहिले राजे आहेत. राजांनी शहाजीराजांच्या अपघाती निधनानंतर सती चाललेल्या स्वत:च्या मातोश्री जिजाऊमाँसाहेब यांना सती जाण्यास विरोध केला व या क्रूर परंपरेला तिलांजली दिली. अशा राजांच्या महाराजी पुतळाबाई सती जाण्यामागची कारणमिमांसा स्पष्ट होणे अत्यंत महत्वाचे आहे, आणि पुतळाबाई राजांच्या खूनानंतर ८५ दिवसांनी सती गेलेल्या आहेत याचा अर्थ पुतळाबाईंना सती जाण्यास प्रवृत्त केले, यासाठी संस्कृती हे हत्यार ब्राह्मणांनी वापरले. परंतु सती जाणे हा संस्कृतपणा नाही, तर अमानुषपणा आहे. हा उघड-उघड खून आहे. पतीनिधनानंतर सती जाण्याची अनिष्ट प्रथा रुढ झाली. पण पत्नीनिधनानंतर एकही पुरुष सता गेला नाही. याचे कारण काय? पुरुषाला सौभाग्य सुवर्णालंकार नसतात. पण स्त्रियांना सौभाग्य अलंकार असतात. पतीनिधनानंतर पत्नीने उंची वस्त्रे परिधान करून सोन्याचे अलंकार अंगावर घालून पतीच्या प्रेताबरोबर जावे व चितेजवळ गेल्यावर ब्राह्मण पुरोहित विधीवत पत्नीला चितेवर बसवत असत. पण त्यापुर्वी सती जाणाऱ्या स्त्रीचे सर्व अलंकार त्या ब्राह्मण पुरोहिताला देणे बंधनकारक असे आणि नंतर चिता पेटवली जात असे. सती जाणारी स्त्री प्राण वाचविण्यासाठी तडफडत असे आणि त्यानंतर चिता पेटवली जात असे. पण तिने बाहेर येवू नये यासाठी हातात लांबलांब काठ्या घेऊन तिला ढकलणारे पुरुष चितेभोवती उभे असत. तिच्या किंचाळण्याचा आवाज येऊ नये यासाठी कर्णकर्कश वाद्यांचा आवाज केला जात असे व हे सर्व निर्दयकृत्य धर्म व संस्कृतीच्या नावाखाली केले जात असे. हे सर्व कशासाठी? तर त्या स्त्रीच्या अंगावरचे सोने ब्राह्मणाला मिळावे, यासाठी ब्राह्मणांनी सतीप्रथा सुरु केली. म्हणजे संपत्तीसाठी देवा-धर्माच्या नावाखाली राजरोस खून करण्याची अनिष्ट परंपरा ब्राह्मणांनी सुरु केली. या प्रथेला पुतळाबाई बळी पडल्या. पुतळाबाईकडून सोने-संपत्ती मिळविण्यासाठी संस्कृतीच्या नावाखाली पुतळाबाईचा ब्राह्मणांनी बळी घेतला. बहुजनस्त्रियाप्रमाणे ब्राह्मणस्त्रियादेखील बळी पडलेल्या आहेत. वर्णव्यवस्थेत भारतातील कोणत्याही स्त्रियांना स्थान नव्हते. ब्राह्मण परकिय आहेत ते

फक्त पुरुषच भारतात आले. ब्राह्मणस्त्रिया बहुजनांच्या असल्यामुळे ब्राह्मणांनी त्यांच्या स्त्रियांचा देखील छळ केला. म्हणूनच पुण्यातील विधवा ब्राह्मण मुलींना जोशी, देशपांडे, अभ्यंकरापेक्षा राष्ट्रपिता जोतिराव फुले आपले वाटले व त्या जोतिरावांच्या आश्रयाला आल्या.

शिवाजीराजांच्या जेष्ठ महाराणी सईबाई यांचे ५ सप्टें. १६५९ रोजी आजारपणात निधन झाले होते. शिवाजीमहाराजांच्या खूनानांतर फक्त पुतळाबाई सती गेल्या. पुतळाबाईशिवाय कोणीही सती गेले नाही. या प्रसंगी ब्राह्मणांनी दबावतंत्राचा वापर केला. या सर्व घटना ब्राह्मणांनी संभाजीराजे नसताना केल्या. *(मोठमोठ्या घराण्यात स्त्रियांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेऊन त्यांना अनेक विधी करण्यास ब्राह्मण प्रवृत्त करतात. पुरुषांच्या परस्पर स्त्रिया गुपचुप यज्ञ-याग, अभिषेक, सत्यनारायण करून अमाप धन देतात.)* देवाधर्माच्या नावाखाली क्रूर वैदिकांनी पुतळाबाईसारख्या आदर्श महाराणीचा खून केला हे मात्र निश्चित. पुतळाबाई २७ जून १६८० रोजी राजांच्या खूनानांतर ८५ दिवसांनी सती गेल्या, नव्हे तर वैदिकांनी पैशासाठी पुतळाबाईचा खून केला. पुतळाबाईच्या समाधीवर जाणीवपूर्वक कु त्रा उभा करण्यात आला आहे.

## रामदास संत नव्हे तर स्वराज्यातील जंत होता

शिवाजीराजांचा सर्वात खतरनाक शत्रू म्हणजे रामदास. त्याला राजांचा गुरु करण्याचा अनैतिहासिक प्रयत्न जातीयवादी इतिहासकारांनी केला. खरे तर राजे आणि रामदास यांची कधीच भेट झाली नाही. म्हणून रामदास हा राजांचा गुरु नव्हता हे सिद्ध होते. पण रामदास राजांचा शत्रू होता हे बहुतांशी लोकांना माहीत नाही.

रामदास हा आदीलशहा आणि औरंगजेबाचा गुप्तहेर होता. अफजलखानाचा मित्र बाजी घोरपडे याच्या आश्रयाला रामदास होता. एका बाजूला राजे गड जिंकतात. किल्ले बांधतात, तर रामदास समाजात भोळेपणा पसरविण्याचे काम करत होता. पुरोहित भटांना जगण्यासाठी रामदासांनी मंदिरे उभारली. राम हा आर्य म्हणजेच ब्राह्मण होता. म्हणूनच रामदासांनी शिवाजीमहाराजांऐवजी रामाचा जयजयकार केला. राजे किल्ले बांधत होते. ज्याचे किल्ले त्याचे राज्य हा तो काळ होता. रामदास मात्र मंदिर बांधत होता. कारण जेथे मंदीर तेथे ब्राह्मणांचे राज्य. राजे तर प्रयत्नांची पराकाष्टा करणारे विज्ञाननिष्ठ राजे होते. राजांच्या या क्रांतीकार्याला विरोध करण्याचे काम या रामदासाने केले.

रामदास हा स्वत:च्या लग्नप्रसंगी सावधान म्हणताच बोहल्यावरुन पळाला. पळण्यापूर्वी तो बोहल्यावर नवरदेव म्हणून उभा होता. म्हणजे त्याने मुलगी पसंत केली होती. लग्न ठरले होते. वऱ्हाडी मंडळी आली होती. वधू त्याच्या समोर उभी होती. मंगलाष्टके सुरु झाली. सर्व मंगलाष्टके झाली आणि

शेवटचे मंगलअष्टक म्हणजे 'आता सावधान' म्हणताच रामदास बोहल्यावरुन पळून गेला. हे एक तर मुर्खपणाचे किंवा समाजद्रोहीपणाचे लक्षण आहे. कारण त्या काळात अंगाला हळद लागली आणि लग्न मोडले तर मुलींना पुन्हा आजन्म अविवाहित रहावे लागत होते. त्या काळात वधूच्या भवितव्याचा आजिबात विचार न करता लग्न मंडपातून पळून जाणारा रामदास शिवाजीराजांसारख्या सामर्थ्यशाली सम्राटाचा गुरु होऊच शकत नाही. खरे तर तो समाजद्रोही होऊ शकतो. कारण त्या वधूच्या जागी आपली बहीण किंवा मुलगी असती तर आपल्याला काय वाटले असते? पुढे रामदासाला विधवा तरुणीशी व्याभिचार करण्याची चटक लागली. वेण्णा आणि आक्का यांच्याशी रामदासाचे अनैतिक संबंध होते. **रामदास हा रंगेल आणि व्याभिचारी होता.** *(संदर्भ-रामदास आणि पेशवाई)* अशा स्त्रीलंपट रामदासाचा राजांनी अनुग्रह घेतला अशी कल्पना करणेसुद्धा अक्षम्य गुन्हा आहे. असा स्त्रीलंपट रामदास समोर जरी आला असता तरी त्याला राजांनी झोडपलेच असते म्हणूनच त्याने राजांची कधीच भेट घेतली नाही. राजांच्या जीवनात आलेल्या कोणत्याही महत्वाच्या व रोमांचकारी प्रसंगाचेवेळी रामदासाने राजांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत केल्याचा कोठेही इतिहासात उल्लेख नाही. अफजलखान भेटीच्याप्रसंगी पन्हाळावेढा, शाईस्तेखानावर हल्ला, आग्रा कैद, राज्याभिषेक या कोणत्याही प्रसंगी रामदास राजांना मदत करण्यासाठी आलेला नव्हता. समकालीन **जेधे शकावली, सभासद बखर, शिवभारत इतर कोणत्याही ग्रंथात रामदासाचा साधा नामोल्लेख देखील नाही.** *(जिज्ञासुंनी संदर्भ ग्रंथ वाचावेत ही विनंती)*

रामदास म्हणतो,

देवी ब्राह्मणी सत्ता करी। तो एक मुर्ख॥६८॥ *(दासबोध-२:१:६८)*

म्हणजे जो ब्राह्मणावर राज्य करतो तो मुर्ख असतो. असे त्याचे मत आहे. म्हणजे ब्राह्मणेतराने फक्त चाकरीच करावी हा त्याचा आग्रह होता. शिवाजीराजे राज्याभिषेकाने राजे झाले. त्यामुळे ब्राह्मणांना देखील शिक्षा करण्याचा अधिकार राजांना प्राप्त झाला. यामुळे तो अस्वस्थ झाला आणि राजांना मुर्ख म्हणण्यापर्यंत त्याची मजल गेली. पुढे तो म्हणतो

निच प्राणी गुरुत्व पावला। तेथे आचरची बुडाला

वेदशास्त्र ब्राह्मणाला । कोण पुसे ॥ *(दासबोध-१४:७:२९)*

रामदासाला बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार झाल्याने कमालीचे दु:ख झाले. अध्ययन हे फक्त ब्राह्मणांनीच करावे हा त्याचा आग्रह आहे. समाजात अनाचार का वाढला तर शूद्रांनी शिकण्यास

सुरुवात केली म्हणून. आचार बुडाला अशी तक्रार तो करतो. बहुजन समाज शिक्षण घेऊ लागल्याने वेदशास्त्रात पारंगत असलेल्या ब्राह्मणास कोणी विचारत नाही याचेच त्याला वाईट वाटते. म्हणजे तो जातियवादी तर होताच पण वर्णव्यवस्थेचा कट्टर समर्थक होता, कडवा ब्राह्मण्यवादी होता. म्हणूनच शूद्रांनी शिक्षण घेतल्यामुळे त्याच्या पोटात दुखु लागले. म्हणून तो पुढे म्हणतो

राज्य नेले म्लेंच्छ क्षेत्री। गुरुत्व नेले कुपात्री ।।

आपण अरत्री ना परत्री। काहीच नाही (दासबोध-१४.७.३६)

राज्य मुसलमान आणि क्षत्रियांकडे गेले. शिवाजीराजांचे गुरुत्व संत तुकोबारायांकडे गेले आपल्या ब्राह्मणांच्या हाती काहीच राहिले नाही म्हणून तो आरडा ओरडा करत होता. हे काही संताचे लक्षण नव्हे. संताच्या कार्याला जात, पात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, देश आणि धर्माचे बंधन नसते. संत हे सर्व सजिवांच्या कल्याणाकरता झटणारे असतात. पण तो फक्त ब्राह्मणांसाठीच झगडत होता म्हणूनच रामदास हा संत नव्हे तर स्वराज्यातील जंत होता. तो ब्राह्मणांच्या उध्दारासाठी व बहुजनांच्या ऱ्हासासाठी कसा झटत होता याचे पुरावे दासबोधातच आढळतात.

गुरु तो सकळासी ब्राह्मण। जरी तो झाला क्रियाहीन

रामदास म्हणतो ब्राह्मण निष्क्रिय-क्रियाहीन असला तरी सर्व जाति धर्माच्या जनतेने ब्राह्मणालाच गुरु करावे. म्हणजे ब्राह्मणी वर्चस्व राहावे व ब्राह्मणांना बिगर श्रमाचे धन मिळावे. ही त्याची ओढ होती. शिक्षक ब्राह्मणांशिवाय कोणी होऊ नये ही त्याची इच्छा होती.

सकळांशी पूज्य ब्राह्मण। हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण

ब्राह्मण वेद मुर्तिमंत। ब्राह्मण तोचि भगवंत

ब्राह्मणाला सर्वांनी देव मानावे हे वेद सांगतात. ब्राह्मण हाच वेद आणि देव आहे असे रामदास म्हणतो. म्हणजे सर्वांनी ब्राह्मणांची पूजा करावी हा आग्रह रामदासाचा होता/

लक्षभोजनी ब्राह्मण। आन जातीस पुसे कोण

लक्षभोजन हा ब्राह्मणांचा हक्कच आहे. इतर जातीला विचारण्याचे कारणच नाही. असे त्याचे मत आहे. म्हणजे ब्राह्मणांना फुकटात भोजन द्यावे असे तो म्हणतो.

असो ब्राह्मण सुरवर वंदिती । तेथे मानव बापुडे किती

आतातर रामदास बहुजन समाजाला भीतीच दाखवितो की ब्राह्मणाला देव वंदन करतात, तर माणसाची काय गत आहे.

जरी ब्राह्मण मुढमती । तरी तो जगदवंद्य

आता तर रामदासाने कहरच केला तो म्हणतो ब्राह्मण मुर्ख असला तरी चालेल तो जगाला वंदनिय असतो. *(डॉ. आंबेडकरांच्या घटनेने बरे झाले नाहीतर सर्व मूर्ख ब्राह्मण सर्व पदांवर राहिले असते.)*

अंत्यज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काय करावा

ब्राह्मण संन्निध पूजावा । हे तो न घडे की ।

दलित हा शब्द उच्चारायला बरा, पण ब्राह्मणांची तो बरोबरी करु शकत नसतो. असे म्हणून त्याने जातियवादाचे टोक गाठले आहे.

अंतर एक तो खरे । परी सांगाते घेऊ न येती महारे

पंडित आणि चाटे पोरे । एक कैसी । ।।३।।

मनुष्य आणि गधडे। राजहंस आणि कोंबडे

राजे आणि माकडे। एक कैसी। ।।४।।

भागीरथीचे जळ आप । मोरी संवदणी तोही आप।

कुश्चिळ उदक अल्प। सेववेना ।।५।।

ब्राह्मण आणि महार यांचा आत्मा एक असला तरी त्यांची आणि ब्राह्मणांची बरोबरी होऊ शकत नाही. *(या ठिकाणी रामदासाने यमकासाठी महार यांचे उदाहरण घेतले असले तरी सर्व जाती नीच आहेत, फक्त ब्राह्मणच श्रेष्ठ आहेत असे त्याचे ठाम मत आहे.)* ब्राह्मण सोडून सर्व जातीला तो गाढव, माकडे, कोंबड्या, चावट, गटारीचे पाणी या उपमा देतो. तर ब्राह्मणाला तो राजा, हंस, गंगेचे पाणी या उपमा

देतो. अशा बहुजनव्देष्ट्या रामदासाच्या दासबोधवर महाराष्ट्र शासनाने बंदी घालावी. रामदास व रामदासी संप्रदायाच्या सर्व वाङ्मयावर बहुजन समाजाने बहिष्कार टाकावा. जगातील सर्व माणसे समान आहेत. जगातील सर्व जाती, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, देश हे मानवनिर्मित आहेत. तरी देखील जातिभेद पसरविणाऱ्या रामदासी सांप्रदायावर **'ॲट्रॉसिटी ॲक्ट'** खाली खटला भरावा.

शिवाजीराजांनी बाबा याकूत, मौनीबाबा, संत तुकाराम यांचा सल्ला घेतल्याचा अनेक ठिकाणी उल्लेख आहे. कारण ते संत चारित्र्यसंपन्न, नि:स्वार्थी आणि बहुजन समाजाचे उध्दारक होते, म्हणुनच राजांना त्यांच्याबद्दल नितांत आदर होता. पण राजे रामदासाच्या भेटीला कधीच गेलेले नाहीत. पण त्याचे शिष्य अनेक वेळा महाराजांकडे भीक मागण्यासाठी आले होते. याप्रसंगी राजे त्यांना विचारतात **'कोण हा रामदास?'** याच अर्थ राजे रामदासाला ओळखत नव्हते. (अधिक माहितीसाठी बाचा इतिहासाचार्य प्रा. मा.म. देशमुख लिखित रामदास आणि पेशवाई)

हर हर महादेव ही राजांची सिंहगर्जना होती. कारण महादेव बहुजन समाजाचा आद्य क्रांतीकारक होता. महादेव हा देव नव्हे. वैदिकांनी महादेवाचेही दैवतीकरण केलेले आहे. रामदासाची घोषणा जय जय रघुवीर समर्थ अशी होती. रामदास आणि शिवाजीराजे यांच्या घोषणेतही साम्य नव्हते. रामदास हा हिरवे कपडे परिधान करीत होता. रामदासाला उत्तम उर्दू येत होती. औरंगजेबाला रामदास अनेकवेळा भेटलेला होता. दोघांनी मिळून भोजन केले होते. याचा अर्थ रामदास आणि औरंगजेबाचे घनिष्ठ संबंध होते. दिल्ली येथे रामदासाने औरंगजेबाबरोबर भोजन केले होते ही वस्तुस्थिती आहे.

शिवाजीराजांना केशरी *(भगवे)* निशाण आणि राजमुद्रा शहाजी राजांना दिलेली होती. म्हणजे गुरु म्हणून रामदासाचे राजाला कसलेही सहकार्य नाही. शिवरायांच्या अनेक गुप्त योजना त्याने औरंगजेबाला-आदिलशहाला सांगितल्या होत्या. बाजी घोरपडेंना शिवरायांविरुद्ध चिथावले होते. राजांच्या विरुद्ध मराठ्यांना भडकविण्याचे काम रामदासाने केले. ब्राह्मणांच्या उद्धारासाठी तो मरेपर्यंत झिजला यात काही गैर नाही. पण स्वत:च्या जातीसाठी काम करीत असताना बहुजनसमाजाला आणि शिवरायांना रामदासाने खूप त्रास दिला. शेवटी त्याने ब्राह्मणांच्या भवितव्यासाठी दासबोध ग्रंथ लिहिला.

एवढे मात्र निश्चित की, संत तुकारामासारख्या चारित्र्यसंपन्न, समाजसुधारक गुरुला संपविण्यासाठीच वैदिकांनी रामदास हा शिवचरित्रात घुसवला. रामदासाला राजांचा गुरु ठरविण्यासाठी ब्राह्मणांनी अनेक खोटे पुरावे, दाखले, स्थळे, चित्रे निर्माण केली.

## आदिलशहाचा मोकाशी दादू कोंडदेव कुलकर्णी

दादू कोंडदेवचे खरे नांव दादू कोंडदेव कुलकर्णी असे आहे. दादू कुलकर्णी हा आदीलशहाचा मोकाशी म्हणजेच नोकर होता. तुकोबारायांना छळणारे हे दादू कुलकर्णीचे समर्थक होते. म्हणजे दादू कुलकर्णी या शिवरायांचा शत्रू होता. शत्रू असणाऱ्या देखील ब्राह्मणांनी गुरु केले. दादू कुलकर्णीचा शिवचरित्राशी काहीही संबंध नाही. दादू कुलकर्णी हा युद्धकलेत अकुशल होता. शिवरायांना युद्धकलेचे शिक्षण शहाजीराजांनी दिले, त्याचा सराव जिजाऊमाँसाहेबांनी घेतला. कान्होजी जेधे, येसाजी कंक, मुंढव्याचे गायकवाड, तुपे, मोझे, पायगुडे इ. शहाजीराजांचे पहिल्या फळीतील कार्यकर्ते आहेत. वीर बाजी पासलकरांनी बाळ शिवबांना पुणे व परिसरात मोलाची मदत केली. ब्राह्मण गुरु असल्याशिवाय कोणीही मोठे होत नाही हे बिंबविण्यासाठी ब्राह्मणांनी दादू कुलकर्णी शिवचरित्रात घुसविला. शिवचरित्राच्या कोणत्याही संदर्भ साधनात दादू कुलकर्णीचा साधा उल्लेख देखील नाही.

## शिवाजीराजांचे गुरु संत तुकोबारायांचा छळ

संत तुकोबाराय हे शिवाजीराजांचे खरे गुरु आहेत याबाबत कोणाचेही दुमत नाही, पण तुकोबारायांचे गुरुपण संपविण्यासाठी रामदास शिवचरित्रात घुसविला. त्यांच्या प्रबोधनामुळेच शिवरायांचे मावळे प्रभावित झाले. राजांनी तुकोबारायांची अनेक किर्तने प्रत्यक्ष ऐकलेली होती. त्यांच्या खऱ्या किर्तनामुळे भटशाही हादरली. त्यामुळे त्यांनी तुकोबारायांना त्रास देणे सुरु केले. त्यांची बदनामी मंबाजी भट, रामेश्वरभट याने केली. त्यांच्या अभंगाची गाथा त्यांनी पाण्यात बुडवली. त्यांना शिक्षा करावी अशी मागणी अशी मागणी देहूच्या दोन ब्राह्मणांनी आदिलशहाचा मोकाशी दादू कोंडदेव याचेकडे केली. शेवटी त्यांची हत्या करून ब्राह्मणांनी सदेह वैकुंठगमन असा अपप्रचार सुरु केला. (महापुरुषांची हत्या झाली म्हणून त्यांच्या योग्यतेला तडा जात नाही. जगातील अनेक महापुरुषांच्या हत्या झालेल्या आहेत म्हणून त्यांना जनतेने नाकारले नाही.) राज्याभिषेकप्रसंगी देखील ब्राह्मण शिवरायांशी उर्मटपणे वागत होते. तेथे तुकोबारायांच्या हत्येप्रसंगी ब्राह्मणांची क्रुरता शिगेला पोहचली होती. शिवराय-तुकोबाराय यांचे आंदोलन संपविण्यासाठी ब्राह्मणांनी मुस्लिमांना हाताशी धरलेले होते.

तुकोबारायांच्या हत्येनंतर पेशव्यांनी गाथा जाळली. त्यांचे अभंग म्हणण्यावर पेशव्यांनी बंदी घातली. निरुपणासाठी जर कोणी अभंग म्हटले तर पेशवाईत शिक्षा केली जात असे. आजदेखील ज्ञानेश्वरांच्या पालखीपुढे तुकोबारायांची आरती म्हणण्यास विरोध केला जातो. देहू आणि आळंदी यांच्या विकासातील फरक प्रकर्षाने जाणवतो. आळंदीचे उदात्तीकरण तर देहू उपेक्षित ठेवण्यामागील

षड्यंत्र कोणाचे? महाराष्ट्रात कोणताही नवीन पाहूणा आला की त्यांना आळंदीला नेले जाते पण देहूला नेले जात नाही. म्हणजे तुकोबारायांना व शिवरायांना विरोध करणार एकच आहेत.

**नेताजी पालकरांच्या धर्मांतराला विरोध करणारे ब्राह्मण गंगाधर कुलकर्णीच्या धर्मांतर प्रसंगी गप्प का?**

नेताजी पालकर हे शिवाजीराजे निष्ठावं सेनापती होते. पण त्यांचे सक्तीने धर्मांतर करण्यात आले. ते महंमदकुलीखान झाले. औरंगजेबाचे नेताजींना अफगाणिस्तानात पाठविले. नेताजींचे नाव बदलले पण मन बदलले नव्हते. धर्म बदलला पण राजांवरील निष्ठा अभंग होती. राजांकडे यावे यासाठी नेताजींनी अनेक वेळा पळून येण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना पाठ फुटेपर्यंत मारले, पण एके दिवशी नेताजी पालकर राजांकडे आले आणि प्रेमाने ते राजांना कडाडून भेटले. त्यांनी स्वधर्मात येण्याची इच्छा व्यक्त केली. केली हे ब्राह्मणांस समजले तेव्हा त्यांनी नेजाजींना स्वधर्मात येण्यास कडाडून विरोध केला. तेव्हा राजे भटांना म्हणाले **निराश्रीतांना जवळ घेणे हाच धर्म आहे. आणि त्यांना दूर लोटणे हा अधर्म आहे. नेताजींना मी धर्मात घेणार. धर्माच्या नावाखाली विरोध केला तरी तुम्ही आणि तुमचा धर्म गुंडाळून ठेवा.** असा सणसणीत इशारा राजांनी दिला. राजांनी धर्ममार्तंड पुरोहितांची हांजी-हांजी केली नाही. संस्कृतीच्या नावाखाली केली जाणारी पिळवणूक थांबविण्यासाठी राजांनी वैदिकांचा विरोध झुगारुन दिला व नेताजी पालकरांना स्वधर्मात घेतले.

आता दुसरी अत्यंत महत्वाची घटना म्हणजे संभाजीराजांच्या काळात औरंगाबाद प्रांतातील कसबे हरसुल येथील गंगाधर रंगनाथ कुलकर्णी याने धर्मांतर केले होते. त्याने स्वखुशीने मुसलमान धर्म स्विकारला होता. सक्तीने त्याचे धर्मांतर झाले नव्हते. पण पुढे गंगाधर कुलकर्णीला परत धर्मांत येण्याची इच्छा झाली. गंगाधरभाई कुलकर्णी संभाजीराजांकडे आला व त्याने राजांजवळ स्वधर्मात येण्याची इच्छा व्यक्त केली. (संदर्भ: छ.संभाजी स्मारक ग्रंथ. पृ.१८३) पण नेताजी पालकरांना स्वधर्मात घेताना जसा विरोध केला होता तसा गंगाधर कुलकर्णीला ब्राह्मणांनी विरोध केला नाही. या प्रसंगी सर्व भट-पुरोहित मूग गिळून गप्प बसले. नेताजींचे सक्तीने धर्मांतर केले होते तसे गंगाधरचे सक्तीचे धर्मांतर नव्हते. तरी नेताजी पालकर व राजांना ब्राह्मणांनी वैदिक धर्मातील अनेक कारणे सांगून प्रखर विरोध केला. मग गंगाधर कुलकर्णीच्या वेळेस कुठे गेला धर्म आणि संस्कृती?

नेताजी पालकरांच्या धर्मांतराला वैदिक धर्मग्रंथातील प्रमाणाव्दारे कडाडून विरोध केला यापाठीमागे नेताजी पालकरांकडून धर्मांतर विधीसाठी धन-संपत्ती मिळविण्याच्या ब्राह्मणांचा हेतू असावा. म्हणूनच नेताजी पालकरांच्या धर्मांतरास सर्व ब्राह्मणांनी विरोध केला. म्हणजे ग्रंथांचा आधार घेऊन विरोध करण्यामागे धर्म, संस्कृती आणि तत्वज्ञान याबाबत ब्राह्मणांना श्रद्धा तर फक्त पैसा-संपत्ती

मिळावी आणि वर्णव्यवस्थेव्दारे ब्राह्मणांचे वर्चस्व सर्व जातींवर रहावे यासाठीच ते धर्मग्रंथाचा वापर करतात. याचा अर्थ धर्मग्रंथाचे दोन भाग पडतात. ब्राह्मणांचे धर्मग्रंथ व बहुजनांचे धर्मग्रंथ. यावरुन सिद्ध होते की, ब्राह्मणांना व्रतवैकल्ये व ग्रंथांचे प्रामाण्य मान्य नाही. पण त्यांनी बहुजनांना मात्र पाप-पुण्याची भिती दाखवून अर्थसत्ता प्रस्थापित केली आहे. धर्मांतर प्रसंगी नेताजी पालकरांच्या पैशावर ब्राह्मणांचा डोळा होता पण गंगाधर कुलकर्णीच्या कडून ब्राह्मणांनी पैशाची का अपेक्षा ठेवली नाही? याचा अर्थ ब्राह्मणांचा आणि बहुजनसमाजाचा धर्म एक नाही. तसेच ब्राह्मण हे देव, धर्म आणि संस्कृतीला मानत नाहीत. ब्राह्मण हे स्वत: देव मानत नाहीत फक्त देव मानण्याचे नाटक करता. सुसंस्कृतपणाचे नाटक करतात. म्हणजे बहुजनसमाज देवाधर्माच्या नादी लागावा हा त्यांचा हेतू असतो. देव हा ब्राह्मणांनी बहुजन समाजाला गाडण्यासाठीच निर्माण केला आहे. त्यामुळे ब्राह्मण देवाच्या दरबारात उर्मटपणे पैसा उकळतात, खोटे बोलतात, भक्तांना दमदाटी करतात, देवाला अर्पण केलेल्या सर्व वस्तु आणि पैसा स्वत: घेतात, मग या ठिकाणी देव मूग गिळून का गप्प बसतो? याच अर्थ ब्राह्मण दैववादी नाहीत. भारतीय संस्कृतीचे ते पालन करीत नाहीत. पण बहुजनसमाजाने करावे यासाठी ते बहुजनांना देवा-धर्मांची भिती घालतात. म्हणून नेताजी पालकरांच्या धर्मांतरास ब्राह्मणांनी विरोध केला पण गंगाधर कुलकर्णीला त्यांनी विरोध केला नाही.

संभाजीराजांना मोगलांच्या ताब्यात देणारा विश्वासघातकी कवि कुलेश

शिवाजीराजे आणि संभाजीराजे या पिता पुत्रात भांडण लावण्याचा मोरोपंत, अण्णाजी दत्तो यांनी कसोशीने प्रयत्न केला. यासाठी त्यांनी संभाजीराजांविरुद्ध खोट्या अफवा पसरवल्या. 'शिवरायांना संभाजीबद्दल प्रेम नाही, ते राजारामाला वारसदार करणार आहेत' अशा प्रकारच्या अफवा पसरवून संभाजीराजांना भडकविण्याचा प्रयत्न केला. यामध्ये ब्राह्मण मंत्र्यांना यश आले नाही. दोघा पिता पुत्रांनी ब्राह्मणांना चांगलेच ओळखले होते. दिलेरखानाची आक्रमकता रोखण्यासाठी शिवरायांनी संभाजीराजांना मोगलांकडे पाठविले होते. पुढे हे दिलेरखानाच्या लक्षात येताच शिवरायांनी संभाजीला सोडवून आणले. आणि संभाजीराजांना पन्हाळ्याचे सुभेदार केले. कवि कुलेश या ब्राह्मणाने संभाजीशी मैत्री संपादन केली. संभाजीराजे आणि सर्व मराठे सरदार यांच्यात भांडण लावण्याचा कुलेशाने प्रयत्न केला. संपत्ती आणि पदाच्या लालसेने तो राजांच्या आश्रयाला आला. स्वकर्तृत्वाने मोठे झालेले बहुजन नेते किंवा राजाच्या जवळ ब्राह्मण येतात. गरीबांची ते कधीच हांजी-हांजी करत नाहीत. पण नेते आणि राजे यांच्याजवळ ते पुर्ण स्वार्थ साधण्यासाठी राहतात. पण जास्त संपत्ती दुसऱ्या बाजूकडून मिळताच ते आपल्या नेत्याचाही घात करतात. अगदी असाच प्रसंग संभाजीराजांच्या जीवनात घडला. औरंगजेबाने कुलेशाला संपत्ती देताच त्याने औरंगजेबाला पुर्ण सहकार्य केले. आणि संभाजीराजांचा घात केला. ज्या कुलेशाला राजांनी छंदोगामात्य *(मुख्य प्रधान)* केले उत्तर भारतातून आलेल्या कुलेशाला

जिवापाड जपले. त्याने राजांचा जीव घेतला. कुलेशावर राजांनी संपुर्ण विश्वास टाकला. त्यानेच राजांचा विश्वासघात केला. औरंगजेबाने कुलेशाला पैसा देताच त्याने राजांशी ताबडतोब गद्दारी केली. याचे कुलेशाला काहीही वाटले नाही. म्हणजे दया करणाराशी देखील निर्दयपणे वागणे हा यांचा स्थायी भाव आहे.

रायगडावर हल्ला करण्याची औरंगजेबाची मोहीम होती. पण त्यासाठी औरंगजेबाला रायगड माहित नसल्यामुळे गडाची प्रतिकृती (मॉडेल) हवी होती. ही प्रतिकृती तयार करण्याची जोखीम कुलेशाने घेतली. त्या बदल्यात औरंगजेबाने कुलेशाला खूप पैसा दिला. कुलेशाने हे काम त्याच्या मुलाकडे सोपविले. म्हणजे कुलेश संभाजीसोबत राहून औरंगजेबाला मदत करीत होता. राजांच्या निर्मळ आणि प्रेमळ मनाचा कुलेशाने गैरफायदा घेतला. म्हणजे कवि कुलेश हा औरंगजेबाचा हितचिंतक होता आणि राजांचा शत्रू होता. राजांना पकडून देण्याची जबाबदारी कवि कुलेशानेच स्विकारली. औरंगजेबाने कवि कुलेशाला खूप पैसा दिला. राजे रायगडावर जाण्यासाठ निघाले, वाटेत संगमेश्वर येथे थांबले. तेव्हा राजे कवि कुलेशाला म्हणाले, ‘ आपण लवकर रायगडाकडे जाऊ या ठिकाणी धोका होण्याची शक्यता आहे.’ तेव्हा कुलेश म्हणाला, ‘‘येथे कोणीही येणार नाही.’ आणि कविकुलेश अनुष्ठानास बसला. तेव्हा राजांनी कविकुलेशाला लवकर निघण्याचा आग्रह केला परंतू कविकुलेशानेच अनुष्ठानात जाणीवपुर्वक वाढ केली. संभाजीराजांना कविकुलेशाने संगमेश्वर येथे रोखून धरल्याची खात्रीलायक बातमी औरंगजेबाला समजली. आणि लगेच औरंगजेबाने मुर्करबखान आणि इखलासखानाला कोल्हापुरावरुन संगमेश्वरला पाठविले. त्यांनी तातडीने येऊन संभाजीराजे व कुलेशाला पकडले. पण या प्रसंगी राजे घोड्यावर निसटले होते पण कुलेश ओरडला ‘महाराज मै गिर गया’! निसटलेले राजे कवि कुलेशाला वाचवण्यासाठी परत फिरले आणि लगेच त्यांना पकडण्यात आले (*संदर्भ- निकोलाओ मनुची लिखीत असे होते मोगल- पृ. २८८*) जेव्हा राजांना पकडण्यात आले तेव्हा ते पुर्ण सावध होते. राजे कोणत्याही विधीत मग्न नव्हते. या उलट राजे लवकर निघण्याचा आग्रह कुलेशाला करत होते. म्हणजे राजांना दुरदृष्टी होती. पण कुलेशाने अनुष्ठानाचे निमित्त करुन राजांना औरंगजेबाचे सैन्य येईपर्यंत अडवून धरले होते. संभाजीराजांसारख्या सरळ मनाच्या राजाचा अशा प्रकारे कविकुलेशाने काटा काढला व बदनाम केले. राजांच्या गणोजी शिर्के व नागोजी शिर्के या मेहुण्यांनी. कुलेशाला निर्दोश सोडण्यासाठी ब्राह्मणी इतिहासकारांनी राजांना गणोजी आणि नागोजी शिर्के यांनी पकडून दिले असे धादांत खोटे लिहिले. राजकारणात कितीही स्वार्थ असला तरीही आपल्या बहिणीचे कुंकू पुसावे असे कोणत्याही भावाला वाटत नसते. गणोजी-नागोजी हे येसुबाईचे भाऊ होते. त्यांनीच राजांना पकडून दिले असा अपप्रचार ब्राह्मणी लेखकांनी केला. म्हणजे क्रुर, स्वार्थी, लबाड कविकुलेशाला निर्दोष सोडण्यासाठी नागोजी- गणोजीला बदनाम करुन बहिण-भावाचे पवित्र नात्याला देखील अनेक पक्षपाती लेखकांनी

कलंक लावला आहे. (*कविकुलेश याच्या फितुरीमुळेच संभाजीराजांना औरंगेबाने पकडले असा स्पष्ट उल्लेख ईश्वरदास नागर, रॉबर्ट आर्म, निकालाओ मनुची या परकीय लेखकांनी केलेला आहे. संदर्भ- छ. संभाजी स्मारक ग्रंथ-पृ. १७०, १९४, १९५, १७१*)

औरगजेबाने संभाजीराजांना मनुस्मृतीसंहितेप्रमाणे ठार मारले

औरगजेबाने संभाजीराजांप्रमाणे आजर्पंत कोणालाही ठार केले नव्हते. राजांना एका घावात ठार मारण्याऐवजी वेगळी शिक्षा का देण्यात आली असावी? प्रथम राजांची जीभ कापण्यात आली. यावरुन असे अनुमान निघते की संभाजीराजांनी संस्कृतवर प्रभुत्व मिळविले होते. त्यांनी चार ग्रंथ लिहिले होते म्हणूनच प्रथम त्यांची जीभ कापण्याचा सल्ला ब्राह्मण सल्लागारांनी दिला. नंतर राजांचे क्रमशः कान, डोळे, त्वचा काढण्यात आली. ही निर्दय शिक्षा मनुस्मृती संहितेप्रमाणे देण्यात आली. म्हणजेच औरंगजेबाच्या माध्यमातून राजांना ही शिक्षा ब्राह्मणांनी दिली. कविकुलेशाला देखील औरंगजेबाने जिवंत ठेवले नाही. कारण जिवापाड प्रेम करणाऱ्या राजांसारख्या स्वाभिमानी, प्रेमळ, निर्मळ आणि जिवलग मित्रावर उलटलेला कुलेश आपला कधी घात करील हे सांगता येणार नाही. म्हणूनच औरंगजेबाने कुलेशालादेखील ठार मारले. कारण औरंगजेबाचा हा चालता बोलता इतिहासच होता. औरंगजेबाने सख्खे भाऊ तसेच जिवलग सरदार दिलेरखान, मिर्झाराजे, जयसिंग या विश्वासू सरदारांनाही ठार मारले होते. त्यामुळे मदत करणाऱ्या कविकुलेशाला औरंगजेबाने जिवंत ठेवणे शक्य नव्हते. कारण कुलेशाला त्याचा मोबदला औरंगजेबाने दिला होता.

औरंगजेबाने संभाजीराजांना धर्म व्देषाने ठार मारले नसुन राजकीय संघर्षामुळे ठार मारले. औरंगजेबाने राजांना फक्त दोनच प्रश्न विचारले. तुमच्या खजिन्याच्या चाव्या कोठे आहेत? आणि माझ्या सरदारांपैकी तुम्हाला कोण फितूर आहे? म्हणजे औरंगजेबाने राजांना धर्मांतराचा आग्रह धरला नव्हता व संभाजीराजांनी धर्मांतरासाठी मुलीची मागणी केली नव्हती. राजांची हत्या झाल्यानंतर ब्राह्मणांनी आनंदोत्सव म्हणुन गुढीपाडवा सुरु केला.

शिवशक बंद करुन मोगलांची फसलीशक सुरु करणारे पेशवे

विश्ववंद्य शिवरायांच्या खुनानंतर छ. संभाजीराजे, राजाराम, ताराबाई आणि शाहुराजांनी भूमिपुत्रांच्या स्वराज्याचे संरक्षण व संवर्धन केले. १७१३ साली शाहुराजांनी कान्होजी आंग्रे मोहिमेवर बाळाजी विश्वनाथ भट याला जाण्यास सांगितले. पण त्याने मला सर्वाधिकार दिल्याशिवाय मी मोहिमेवर जाणार नाही असे बाळाजी भट शाहूराजांना उर्मटपणे म्हणाला. शाहूराजांना अडचणीत पकडून बाळाजी भटाने पेशवेपद घेतले. आणि अशा प्रकारे शिवाजीमहाराजांनी कष्टाने उभारलेले गरिबांचे

स्वराज्य रक्तपिपासू, अत्याचारी, जातयवादी, देशद्रोही आणि शिवाजीद्रोही पेशव्यांच्या हातात गेले. पेशव्यांच्या हातात सत्ता येताच पेशव्यांनी शिवरायांनी राज्याभिषेकापासून सुरु केलेला शिवशक बंद केला. संपुर्ण महाराष्ट्राचा कारभार शिवशकाप्रमाणे चालत होता. तो शिवशक पेशव्यांनी बंद करुन त्याऐवजी मोगल बादशहाची फसलीशक सुरु करणारे पेशवे यांनी शिवाजीराजांच्या सर्व पाऊलखुणा नष्ट करण्यास आरंभ केला. शिवाजीराजांचे संपूर्ण कार्य पुसण्याचा सपाटा पेशव्यांनी सुरु केला. पेशव्यांनी अन्यायाचा कळस गाठला. वर्णभेद व जातीभेदाची पेशव्यांनी पुर्नस्थापना केली. टोकाचा धर्ममार्तंडपणा सुरु झाल. हे राष्ट्रपिता जोतिराव फुले यांनी पाहिले.

सर्व जगाला शिवाजीराजांच्या कार्याबद्दल कमालीचा आदर असताना राजांच्या गादीवर अतिक्रमण केलेल्या पेशव्यांनी मात्र शिवशिक बंद करुन मोगल बादशहाचा फसलीशक सुरु करण्यामागे मुललमानांचा अनुनय करण्याचा पेशव्यांनी प्रयत्न केला. शिवाजीराजांबद्दल पेशव्यांना असणारी घृणा या ठिकाणी स्पष्ट जाणवते. भारतासह सर्व जगातील मुसलमानांना खुष करण्यासाठी पेशव्यांनी स्वराज्यावर नांगर फिरवला. जिजाऊमाँसाहेबांनी बांधलेला भव्य-दिव्य लालमहाल पाडून त्या ठिकाणी शनिवारवाडा बांधला.

शिवशक बंद करुन फसलीशक सुरु करण्यामागे पेशव्यांचा एक डाव होता, तो म्हणजे मुसलमानांचे राज्य संपुर्ण भारतात येईल आणि त्यांचा वरदहस्त आपणावर कायमचा रहावा यासाठी पेशव्यांनी फसलीशक सुरु केला. परंतु इंग्रजांनी आघाडी मारली आणि संपूर्ण भारत इंग्रजांनी जिंकला. तेव्हा इंग्रजांनी पेशव्यांना देखील पराभूत केले. पेशव्यांचा फसलीशक सुरु करण्यामागचा डाव फसला. त्यानंतर ब्राह्मणांनी ग्रिगेरियन कॅलेंडर (*जानेवारी- डिसेंबर*) स्विकारले. कारण हे पाश्चिमात्यांचे कॅलेंडर आहे. म्हणजे इंग्रजांची सत्ता भारतात आल्याबरोबर सर्व इंग्रजी भाषा, कॅलेंडर, शिक्षण, नोकरी व इंग्रजांशी मैत्री ब्राह्मणांनी स्विकारली. म्हणजे धन, संपत्ती आणि सत्तेसाठी शिवाजीराजांच्या स्वराज्याला पेशव्यांनी सुरुंग लावला. (समुद्र ओलांडणे पाप आहे, असे बिंबवणाऱ्या ब्राह्मणांनीच लंडन येथे जाऊन शिक्षण घेतले. बहुजनसमाजाला जगाचे ज्ञान होऊ नये यासाठीच ब्राह्मणांनी सिंधुबंदी सुरु केली. इंग्रजविरोध यापाठीमागे ब्राह्मणांचा स्वार्थ होता. सावरकरांचे शिक्षण लंडन येथे झाले. वासुदेव बळवंत फडके, मंगल पांडे हे देखील इंग्रजांकडे नोकरीला होते. ब्राह्मण स्वत:ची मुले इंग्रजी शाळेत घालतात तरीही इंग्रजीला विरोध करतात. कारण बहुजनसमाज इंग्रजी भाषा शिकला तर त्यांची मुले ब्राह्मण मुलांची स्पर्धक होतील म्हणून ब्राह्मण इंग्रजी भाषेला विरोध करतात. ब्राह्मणांचे मराठी भाषेवरील प्रेमाचे फक्त ढोंग आहे. जगात स्पर्धेत टिकण्यासाठी इंग्रजी भाषा शिकावी. कारण इंग्रजी जगातील सर्वात सोपी भाषा आहे. इंग्रजी ही ज्ञान, संपर्क, वैश्विक भाषा आहे.)

शिवजयंती बंद पाडण्यासाठी टिळकाने गणेशोत्सव सुरु केला

पेशव्यांनी रायगडावरील दप्तरखाना जाळला, राणीवसा पाडला, राजदरबार तोडला, समाधी उद्ध्वस्त केली, राजांनी मुस्लिम सैनिकांसाठी बांधलेली मशिद पाडली, पण जगदिश्वराच्या मंदिराला हात लावला नाही. म्हणूनच आज रायगडावरील मंदिर चांगले आहे पण राजदरबार नष्ट झालेला आहे. राष्ट्र पिता जोतिराव फुले यांना शिवरायांच्या स्वराज्याची वैदिकांनी चालवलेली विटंबना पाहवेना, म्हणून राष्ट्रपिता फुले १८६९ साली रायगडावर गेले. शिवजयंती सुरु करण्यासाठी त्यांनी राजांच्या समाधीचा तपास केला, पण त्यांना समाधी सापडेना. तीन दिवस राष्ट्रपिता जोतीराव फुले तथा तात्या यांनी वेली तोडून घाणेरी काढली व समाधीचा शोध घेतला. तात्यारावांनी समाधी धुवून स्वच्छ केली. राजांच्या समाधीस तात्यारावांनी भक्तीभावाने अभिवादन केले आणि समाधीवर फुले वाहिली. तात्या शिवरायांच्या समाधीची पुजा केल्याचे ग्रामजोशीस समजले तेव्हा जोशींच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तो समाधीजवळ आला आणि समाधीवरील फुले लाथेने बाजूला सारली आणि तात्यांना म्हणाला 'अरे कुणबटा! त्या शूद्र शिवाजीची तू पूजा करतोस काय? तो काय राजा होता होय'? असे अर्वाच्य भाषेत भट जोशी राष्ट्रपिता फुले आणि शिवरायांना बोलू लागला. तात्यांना खूप दुःख झाले. त्यानंतर तात्यांनी शिवरायांचा खूप चांगला पोवाडा लिहिला. तात्यांनी शिवजयंतीला सुरुवात केली. (१८७०) पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात रा. फुले यांनी शिवजयंती मोठ्या उत्साहाने सुरु केली. पेशव्यांना याची चीड आली, पण ते शिवजयंतीला थेट विरोध करु शकत नव्हते. कारण रा.फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने महाराष्ट्रात फार मोठी जागृती केली होती. शिवजयंतीला थेट विरोध करणे अशक्य असल्याने त्यांनी पर्याय दिला. तो पर्याय म्हणजे गणोत्सव! गणपती हा पेशव्यांचा देव आहे. बहुजनसमाजाचा गणपतीशी काहीही संबंध नाही. पण पेशवे कैवारी बाळ गंगाधर टिळकाने शिवजयंतीला रोखण्यासाठी पेशव्यांच्या खाजगी गणपतीचा सार्वजनिक उत्सव केला. म्हणजे टिळकाने शिवजयंती संपावी यासाठी १८९३ साली गणोत्सव सुरु केला.

लाला लजपतरायांनी **सिवोजी** नाचाचे उर्दूमधून शिवचरित्र लिहिले. त्यामुळे राजे पंजाब-सिंध (*आताचे पाकिस्तान*) पर्यंत समजले. रविंद्रनाथ टागोर, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे शिवाजीराजे हे आराध्य दैवत होते. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणाले की **प्रसंगी जन्मदात्या बापाचे नाव बदलेन पण कॉलेजला दिलेले शिवाजीराजांचे नाव मी कधीच बदलणार नाही.** ते भाऊराव पाटील जैन होते. त्यांच्यामुळे शिवाजीराजांच्या रयतेला शिक्षण मिळाले. कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे, डॉ.पंजाबराव देशमुख, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसिंह नाना पाटील, संत गाडगेबाबा, प्रबोधनकार केशव सी. ठाकरे इ. समाजसुधारकाची शिवरायांवर अनन्यनिष्ठा होती. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वभूषण भारतरत्न डॉ.बाबासाहेब यांचा शिवचरित्राचा सखोल अभ्यास होता. त्यांनी **शुद्र पुर्वी कोण होते?** या ग्रंथात

शिवाजीराजांबाबत खूप सखोल माहिली लिहिलेली आहे. शिवाजीराजांच्या त्रिशताब्दी उत्सवाच्या निमित्ताने बदलापुर येथे आयोजित केलेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. या प्रसंगी राजांच्या जीवनावर अभ्यासपुर्ण आणि प्रभावी भाषण केले. त्यामुळे राजांचे अपरिचित रुप जनतेला समजले. शिवाजीराजांच्या राज्याभिषेकाला ब्राह्मणांनी केलेल्या विरोधाचा बदला डॉ.आंबेडकरांनी घेतला. डॉ.आंबेडकरांनी बहुजन समाजाला राजा होण्याचे स्वतंत्र दिले, तुम्ही शूद्र आहात त्यामुळे मुख्यमंत्री होता येणार नाही. असे आज कोणीही ब्राह्मण म्हणणार नाही. हा अधिकार सर्व बहुजन समाजाला डॉ.आंबेडकरांनी दिला. राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांनी शिवजयंती सुरु केली. म्हणजे फुले, आंबेडकर या गुरु शिष्यांना शिवाजीराजांचा सार्थ अभिमान होता. त्यांचे राजांवर डोळस प्रेम होते. आंधळे प्रेम नव्हते.

शिवाजीराजांचे भांडवल करुन फुले-आंबेडकरांनी समाजामध्ये धार्मिक व जातीय दंगे निर्माण केले नाहीत. किंवा शिवाजीराजांच्याव्दारे त्यांनी बहुजन समाजाचे वैदिकीकरण केले नाही. फुले-आंबेडकरांनी शिवाजीराजांचा खरा इतिहास देशाला सांगितला. डॉ.आंबेडकर लेटरहेडवर **जय शिवराय** लिहायचे.

साहित्यरत्न थोर देशभक्त आणि समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांनी गणपतीला वंदन असणारा पारंपारिक गण बदलला. गणाचा आरंभ शिवछत्रपतींना वंदन करुनच सुरु केला. अण्णाभाऊंनी शिवरायांवर महाराष्ट्राची परंपरा हा पोवाडा लिहिला आण्णाभाऊ रशियात गेल्यानंतर त्याठिकाणी शिवचरित्रावर रशियन प्रा.चेलिशिव आण्णांना भेटले. आण्णांनी त्यांना शिवरायांच्याबाबत खूप दुर्मिळ माहिती सांगितली. म्हणजेच **आण्णाभाऊंमुळेच रशियन जनतेला शिवरायांचे कार्य माहित झाले.** शिवरायांचे कार्य आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर पोहचविण्यासाठी बहुजन समाजातील विचारवंतांनी मोलाचे कार्य केले आहे.

शिवरायांना मर्यादित करणारे अत्रे-महाजन

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिवाजीराजांचे जीवन व कार्य राज्यस्तरावर व जातीस्तरावर ठेवण्यासाठी ब्राह्मण नेत्यांनी जाणीवपुर्वक प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनप्रसंगी प्र.के. अत्रे यांनी इतर राज्यावर टिका करताना शिवाजीराजांचा वापर केला. इतर राज्यांना फक्त भूगोल आहे. पण महाराष्ट्राला भूगोलासह इतिहास आहे. असे टोमणे मारत राजांचे नाव घेतले. त्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला मर्यादा पडल्या राजकारणात शिवरायांचा वापर सुरु झाला. राजकीय पक्षांची बांधणी शिवरायांच्या नावाने झाली. परंतु प्रबोधनकारांचा शिवाजी जनतेला सांगितलाच नाही. प्रबोधनकार केशव सी.ठाकरे हे

थोर इतिहास संशोधक व समाजसुधारक होते. त्यांनी शिवरायांचा खरा इतिहास जनतेला सांगितला. **प्रबोधनकार ठाकरे म्हणत की, शिवाजीराजे ३३ कोटी देवांपेक्षा महान आहेत. डोक्यातून दैववाद काढूनच शिवरायांचा अभ्यास करावा.**